मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १६१ ■ बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# भारत-फ्रान्स संबंधांना ‘स्पेशल ग्लोबल स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप’चा दर्जा – प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची घोषणा

**मुंबई :** बदलत्या जागतिक परिस्थितीत भारत आणि फ्रान्स या दोन्ही देशांनी जागतिक स्थैर्य, समृद्धी आणि नियमाधिष्ठीत व्यवस्थेला बळकटी देण्याचा संकल्प करत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारत-फ्रान्स संबंधांना ‘स्पेशल ग्लोबल स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप’चा नवा दर्जा देण्यात येत असल्याची घोषणा केली.

फ्रान्स प्रजासत्ताकचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या मुंबई भेटीदरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मॅक्रॉन यांच्यात लोकभवन येथे बैठक झाली. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना दोन्ही नेत्यांनी या द्विपक्षीय सहकार्याला नव्या उंचीवर नेण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी त्यांच्या हस्ते भारतामध्ये एअरबस एच125 हेलिकॉप्टरसाठी टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टिम्सच्या असेंब्ली लाईनचे दूरदृष्यप्रणालीद्वारे उद्घाटन करण्यात आले. यावेळी परराष्ट्र व्यवहार मंत्री एस.जयशंकर यांच्यासह दोन्ही देशांचे शिष्टमंडळ उपस्थित होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले की, भारत आणि फ्रान्सचे संबंध विश्वासावर आधारित आहेत. फ्रान्स हा भारताच्या सर्वात जुन्या धोरणात्मक भागीदारांपैकी एक असून राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांच्या नेतृत्वाखाली या भागीदारीला अभूतपूर्व गती आणि ऊर्जा मिळाली आहे. आजच्या अस्थिर जागतिक परिस्थितीत ही भागीदारी केवळ धोरणात्मक नसून जागतिक स्थैर्य आणि प्रगतीसाठीची



भागीदारी ठरेल, असे त्यांनी यावेळी नमूद केले.

हेलिकॉप्टर असेंब्ली लाईनचे उद्घाटन हे परस्पर विश्वासाचे प्रतीक असल्याचे प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितले. फ्रान्सच्या सहकाऱ्याने माउंट एव्हरेस्टच्या उंचीपर्यंत उड्डाण करू शकणारे एकमेव हेलिकॉप्टर भारतात तयार होणार असून ते जागतिक बाजारपेठेत निर्यातही केले जाणार आहे. त्यामुळे दोन्ही देशांच्या भागीदारीमध्ये खोल समुद्रापासून पासून उंच पर्वतापर्यंत पोहोचण्याची क्षमता असल्याचे ते म्हणाले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 2026 हे वर्ष भारत-युरोप संबंधांसाठी निर्णायक ठरणार असल्याचे सांगितले. अलीकडेच यूरोपियन यूनियनसोबत झालेल्या मुक्त व्यापार करारामुळे भारत-फ्रान्स व्यापार संबंधांनाही मोठी चालना मिळणार आहे. ‘इंडिया फ्रान्स इयर्स ऑफ इनोव्हेशन’ उपक्रमांतर्गत संरक्षण, स्वच्छ ऊर्जा, अवकाश आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रात उद्योग, स्टार्टअप्स, एमएसएमई, विद्यार्थी आणि संशोधक यांच्यासाठी संयुक्त इनोव्हेशन सेंटर्स स्थापन करण्याचाही निर्णय घेण्यात आला असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले. क्रिटिकल मिनरल्स, बायोटेक्नॉलॉजी आणि ॲडव्हान्स मटेरियल्समध्ये सहकार्य वाढवले जाणार असून ‘इंडो-फ्रेंच सेंटर फॉर एआय इन हेल्थ’, ‘इंडो-फ्रेंच सेंटर फॉर डिजिटल सायन्स अँड टेक्नॉलॉजी’ आणि एरोनॉटिक्स कौशल्य विकासासाठी राष्ट्रीय केंद्राची स्थापना करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, भारत आणि फ्रान्स दोन्ही देश लोकशाही मूल्ये, कायद्याचे राज्य आणि बहुपक्षीय व्यवस्थेवर विश्वास ठेवतात. जागतिक संस्थांमध्ये सुधारणा करूनच जागतिक आव्हानांवर मात करता येईल, अशी दोन्ही देशांची भूमिका असल्याचे सांगून युक्रेन, पश्चिम आशिया किंवा इंडो-पॅसिफिक परिसरात शांततेसाठी सर्व प्रयत्नांना समर्थन देण्याची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. सर्व प्रकारचा दहशतवाद संपविण्याचीही दोन्ही देशांची सामायिक बांधिलकी असल्याचे त्यांनी सांगितले. भारत आणि फ्रान्स दरम्यान सांस्कृतिक देवाणघेवाण अधिक दृढ करण्यावर भर दिल्याचे सांगून फ्रान्समध्ये लवकरच ‘स्वामी विवेकानंद सांस्कृतिक केंद्र’ सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

दोन्ही देश मिळून जागतिक स्थैर्य आणि समृद्धीसाठी कार्य करूया, असे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मॅक्रॉन यांना केले.

## गरिबांसाठी शाळा चालविणारे महेंद्रशेठ बहुआयामी नेतृत्व : भावना घाणेकर

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी** : "उलवे नोड झपाट्याने विकसित होत आहे. येथे श्रीमंतांसाठी भरपूर शाळा आहेत; परंतु गरिबांसाठी इंग्रजी माध्यमाची शाळा चालविणारे महेंद्रशेठ घरत हे बहुआयामी नेतृत्व आहेत. मी एकेदिवशी सीपी कार्यालयात बसले होते. तेव्हा महेंद्रशेठ मला म्हणाले, 'नगराध्यक्षपद महिलांसाठी राखीव आहे, भावना तू उभी राहा,' वास्तविक मी या गोष्टीचा विचारही केला नव्हता; परंतु महेंद्रशेठ घरत यांनी माझे नाव पुढे केले, प्रोत्साहन दिले आणि अनमोल सहकार्यही केले. त्यामुळे मी उरणची नगराध्यक्षा झाले. महेंद्रशेठ यांची ख्याती सर्वांना माहिती आहेच, पण माझ्या मागे खंबीरपणे त्यांच्या रूपाने मोठा भाऊ उभा आहे, याचा मला सार्थ अभिमान आहे," असे उरणच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावनाताई घाणेकर गव्हाण येथे म्हणाल्या. यमुना सामाजिक



शैक्षणिक संस्थेच्या न्यू इंग्लिश मिडीयम स्कूल, शेलघर-गव्हाणचे स्नेहसंमेलन सोमवारी (ता. १६) उत्साहात पार पडले. त्यावेळी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष महेंद्रशेठ घरत होते. ते म्हणाले, "आईच्या नावाने शैक्षणिक संस्था काढली आहे. त्या शाळेत गरिबांची मुले शिकली पाहिजेत, येत्या काळात शाळेची भव्य इमारत उभी राहील, असा मला आशावाद आहे.

## पनवेल पालिका महापौर नितीन पाटील यांच्या विनंतीने प्रहार व अन्याय अत्याचार समितीचे ठिय्या आंदोलन स्थगित

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत प्रहार जनशक्ती पक्ष,अन्याय अत्याचार निर्मूलन समिती आणि आदिवाशी विकास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने वेळोवेळी पालिका आयुक्त यांना निवेदन देत नागरी समस्या सोडवण्याची मागणी केली होती. परंतु पालिका प्रशासनाकडून याबाबत ठोस उपाययोजना न झाल्याने पालिकेला ठिय्या आंदोलनाचा इशारा देण्यात आला व आंदोलन करण्यात आले, या वेळी आंदोलन स्थळी नितीन पाटील, महापौर यांनी भेट देऊन आंदोलनकर्ते यांच्याशी चर्चा करून मागण्या मान्य करत सकारात्मक प्रतिसाद देत आंदोलन



स्थगित करण्याची विनंती केली व पालिका आयुक्त आणि प्रशासनानासोबत पुढील आठवड्यात गुरुवारी बैठक घेणार असल्याचे मान्य केल्याने आंदोलन स्थगित करण्यात आल्याची माहिती सुनील शिरीषकर, जिल्हा उपाध्यक्ष रायगड यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

या आंदोलनास प्रहार जनशक्ती पक्षाचे राज्य प्रवक्ते मनोज टेकाडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली असून प्रहारचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुनील शिरीषकर , अन्याय अत्याचार निर्मूलन समिती अध्यक्ष, संतोष चालके आदिवासी विकास परिषद, बी. पी. लांडगे, यांच्या नेतृत्वात झाले. आंदोलना दरम्यान महापौर नितीन पाटील यांनी आंदोलन स्थळी भेट घेऊन प्रहार, आदिवाशी विकास परिषद अन्याय अत्याचार निर्मूलन समितीने उपस्थित केलेल्या पनवेलकर नागरिकांच्या समस्या बाबत माहिती घेतली आणि येत्या गुरुवारी महापौर यांच्या उपस्थितीत संघटनेच्या पदाधिकारी व पालिका आयुक्त यांच्यात बैठक घेण्याचे आश्वासन दिले. पालिकेचे सार्वजनिक सुविधायुक्त रुग्णालय बांधणे, सार्वजनिक परिवहन सेवा सुरू करणे, आदिवासी वाघऱ्याचीवाडी इथे पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे, हवा प्रदूषण करणाऱ्या विकासकांवर कारवाई करणे, कंट्राटी कामगारांना सर्व सुविधा देणे, अनाधिकृत आणि बेकायदेशीर फेरीवाले यांच्यावर कारवाई करणे आदी मागण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्ष, अन्याय अत्याचार निर्मूलन समिती आणि आदिवासी विकास परिषद यांच्या संयुक्त विद्यमानाने आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाचे यशस्वी नियोजन प्रहार चे पदाधिकारी अजय कदम राहुल तेलंग,अन्याय अत्याचार निर्मूलन समिती चे परेश लोंढे आणि आदिवाशी विकास परिषद अशोक चौधरी यांनी केले. महापौर यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे नागरी प्रश्ना संदर्भात कारवाई न झाल्यास पुढील आंदोलन प्रहार स्टाइल होईल असा इशारा सुनील शिरीषकर, जिल्हा उपाध्यक्ष रायगड यांनी दिला आणि आजचे आंदोलन तुर्तास स्थगित केले.

## महागाव नगराध्यक्ष अविश्वास ठराव बारा विरुद्ध शुन्य मतांनी पारित

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव ( यवतमाळ)** : महागाव नगर पंचायतीत चार वर्षाच्या सत्ताकाळात दुसऱ्यांदा राजकिय उलटफेर झाला. काँग्रेस महाविकास आघाडीच्या नगराध्यक्ष सुनंदा दिलीप सुरोशे कोपरकर यांच्या विरोधात नगर सेवकांनी दाखल केलेला अविश्वास प्रस्ताव बारा विरुद्ध शुन्य मतांनी पारित झाला त्यामुळे नगराध्यक्षांना पायउतार व्हावे लागले आहे. गटनेते शैलेश सुरोशे कोपरकर यांनी आपल्या आईचे नगराध्यक्षपद वाचविण्यासाठी पराकोटीचा आटापिटा केला परंतू त्यांना अखेर अपयश आले. नगराध्यक्षांविरोधात अविश्वास प्रस्तावावर मतदान होण्यापूर्वी नगर पंचायत सभागृहाच्या परिसरात शक्तीप्रदर्शन करण्यासाठी दोन्ही गटांचे समर्थक उपस्थित होते,त्यामुळे तणावाची स्थिती होती.मात्र अखेर कोपरकर गटाने समोर पराभव अटळ असल्याचे दिसताच सभागृहातून काढता पाय घेतला. काँग्रेस गटनेते शैलेश सुरोशे कोपरकर यांच्या मनमानी कारभारामुळे विरोधक बिथरले होतेच परंतू सत्तेत काँग्रेस सोबत असलेल्या नगरसेवकांचा विश्वासही कोपरकर यांनी गमावला होता. त्यामुळे भाजपाचे गटनेते गजानन सोपान साबळे, माजी उपनगराध्यक्ष सुरेश उत्तमराव नरवाडे, सौ.रंजना दीपक आडे,सौ.अशा शंकर बावणे,शिवसेनेचे नगरसेवक तथा विद्यमान उपनगराध्यक्ष

प्रमोद उर्फ शाका भरवाडे,रामराव काशिनाथ नरवाडे,युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष



विशाल प्रकाश पांडे सौ.सुनीता शिवाजी डाखोरे, सौ. करुणा नारायण शिरबिरे. या सोबतच सत्ताधारी काँग्रेस चे मो. परवेज शफी सुरैया,श्रीमती जयश्री अशोक इंगोले, सौ.जयश्री संजय नरवाडे या सर्वपक्षीय बारा नगरसेवकांनी नगराध्यक्षांची उचलबांगडी करण्यासाठी कंबर कसली होती. १० फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी यांच्या समक्ष अविश्वास प्रस्ताव दाखल करून १२ नगरसेवक पर्यटनासाठी गेले होते. जिल्हाधिकारी यांच्याकडे दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावात अनेक त्रुट्या असल्याचा पवित्रा घेत अध्यक्षा सुनंदा सुरोशे कोपरकर यांनी मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठात याचिकाही दाखल केली होती.

त्यामुळे आज नेमका काय निर्णय येईल याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते. परंतू न्यायालयाने ही याचिका सकाळीच निकाली काढली आणि विरोधकांच्या आशा पल्लवित झाल्या. साडेअकरा वाजता नगरसेवकांचा ताफा पोलीस बंदोबस्तात नगर पंचायत सभागृहात दाखल झाला. अविश्वास प्रस्ताव उधळण्याचे सर्व प्रयत्न फोल ठरल्यानंतर गटनेते शैलेश कोपरकर यांनी शस्त्र म्यान केले. शेवटी नगराध्यक्षा सुनंदा कोपरकर यांच्या विरोधतील अविश्वास ठराव बारा विरुद्ध शुन्य मतांनी पारित झाल्याची घोषणा पिठासीन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांनी केली. नगराध्यक्ष सुनंदा सुरोशे कोपरकर, गटनेते शैलेश सुरोशे कोपरकर, नगरसेविका सुरेखा विनोद कोपरकर, रुपाली संतोष कोल्हेकर आणि नगरसेवक महेश पाटील हे मतदानाला सभागृहात उपस्थित नव्हते.

शहराच्या विकासासाठी सर्वपक्षीय नगरसेवकांची वज्रमुठ

शहराला विकासाच्या मार्गावर अग्रेसर करण्यासाठी सर्वपक्षीय नगरसेवकांची मोट बांधून येत्या वर्षभरात शहरात मोठ्याप्रमाणात विकास कामे मार्गी लावली जातील अशी प्रतिक्रिया भाजपाचे गटनेते गजानन साबळे यांनी व्यक्त केली.

शिवसेना जिल्हा प्रमुखांची शिष्टाई असफल

महाविकास आघाडीचा घटक असलेल्या शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख तथा महागाव न.पं चे उपाध्यक्ष प्रमोद उर्फ शाखा भरवाडे यांची समजूत काढण्यासाठी सेनेचे जिल्हा प्रमुख प्रविण शिंदे आणि राजेंद्र गायकवाड स्वतः न.प सभागृहाबाहेर तळ ठोकून होते. पर्यटनाला गेलेल्या नगरसेवकांची ट्रॅव्हल्स येताच त्यांनी प्रमोद भरवाडे यांचे ब्रेन वॉशिंग करण्याचा प्रयत्न केला परंतू ‘माझ्या कुटुंबाच्या सुरक्षेचा प्रश्न आहे’ असे उत्तर देत प्रमोद भरवाडे यांनी वरिष्ठांना निरुत्तर केले व सभागृहात जाऊन मतदान केले.

## तक्रारीनंतर शिक्षण विभाग सतर्क; गैरकारभार उघडकीस येण्याची शक्यता

**दैनिक युवक आधार**

**किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख** : अखेर जनता शिक्षण प्रसारक मंडळ उमरदरी संस्थेच्या 11 शाळातील सन 2012 नंतर झालेल्या नियुक्त्यांची चौकशी शिक्षण संचालक पुणे करणार*.. *सर्व प्रस्ताव दाखल करण्याचे संचालकांचे आदेश नांदेड- जनता शिक्षण प्रसारक मंडळ उमरदरी ता.मुखेड संस्थेच्या 11 शाळातील गैर कारभाराच्या जेष्ठ पत्रकार सखाराम कुलकर्णी यांनी दिलेल्या तक्रारीवरून सन 2012 ते 2025 पर्यंत नियुक्त केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता व शालार्थ आयडी प्रकरणात झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्यासाठी दस्तऐवज व प्रस्ताव संचालक पुणे कार्यालयात दि. 18 फेब्रुवारीला दाखल करण्याचे आदेश डॉ. महेश पालकर शिक्षण संचालक पुणे यांनी शिक्षणाधिकारी नांदेड व शिक्षण उपसंचालक लातूर यांना दिले. ह्या आदेशामुळे शिक्षण विभागात व शिक्षकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले.

जनता शिक्षण प्रसारक मंडळ उमरदरी ता. मुखेड संस्थेच्या नांदेड जिल्ह्यातील तीन प्राथमिक, तीन माध्यमिक व तीन उच्च माध्यमिक शाळा तसेच छत्रपती संभाजीनगर येथील एक प्राथमिक व एक माध्यमिक शाळेत सन 2012 नंतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची झालेली नियुक्ती त्यांच्या वैयक्तिक मान्यता शालार्थ आयडी प्रकरणात प्रचंड गैरकारभार व अनियमितता झाल्याची तक्रार जेष्ठ पत्रकार सखाराम कुलकर्णी सन



2019-20 पासून करत होते. या गैर व नियमबाह्य कारभारात शिक्षण विभाग नांदेड व शिक्षण उपसंचालक विभाग लातूरचे अधिकारी सहभागी असल्यामुळे गैरकारभार केलेल्या अधिकाऱ्याकडून गैरकारभाराची चौकशी करू नये अशी मागणी सखाराम कुलकर्णी शासन दरबारी व शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक पुणे यांचेकडे करत होते. तरी गैरकारभार केलेले तत्कालीन शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर यांनी सन 2022 ला सर्व शाळांची चौकशी संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष शिवाजी जाधव यांचे जवळ बसून केली व कुळकर्णी यांच्या तक्रारीत तथ्य नसल्याचे अहवालात नमूद केले. व आपला गैर कारभार व भ्रष्टाचार झाकण्याचा प्रयत्न केला. या अहवालावर कुलकर्णी यांनी सचिव शालेय शिक्षण मुंबई ,व शिक्षण संचालक पुणे यांच्याकडे आक्षेप घेऊन उच्च स्तरावर पारदर्शक चौकशी होण्यास संचालक कार्यालयातच चौकशी करावी अशी मागणी केली. पण संचालक कार्यालयातील ही काही अधिकारी झारीतले शुक्राचार्य असल्यामुळे चौकशी होतच नव्हती. शेवटी सखाराम कुलकर्णी यांनी दि. 12 फेब्रुवारी रोजी शिक्षण आयुक्त सचिनवर सचिंद्र प्रताप सिंह यांची भेट घेऊन सत्यप्रकार पुराव्यासह सांगून दाखल केला. बनावट ठराव, 20 टक्के शालार्थ आय डी असताना 100 टक्के वेतन देण्यात येते, लाखाने मागील थकबाकी काढणे यावर दोन तास चर्चा झाल्यावर व संचालकांचा दिरंगाई व चालढकल पणा दिसल्यावर तसेच वैयक्तिक मान्यता व शालार्थ आयडी प्रकरणात अनियमितता झाल्याचे लक्षात आल्यावर आयुक्तांनी सदरील प्रकरणी संचालक कार्यालया कडून चौकशी करण्यास शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांना सांगितले. ह्या आदेशानंतर डॉ. महेश पालकर शिक्षण संचालक पुणे यांनी शिक्षणाधिकारी नांदेड व शिक्षण उपसंचालक लातूर यांना आदेश काढून मुद्देसूत सूचना दिल्या. त्यात त्यांनी सन 2012 ते 2025 पर्यंत झालेल्या वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव, शंभर टक्के व वीस टक्के अनुदानाचे आदेश, संस्थेचे कार्यकारी मंडळाची माहिती, विनाअनुदानित वरून अनुदानित पदावर बदल्या केलेल्या कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव व इतर सर्व दस्तऐवज घेऊन दि. 18 फेब्रुवारी रोजी शिक्षणाधिकारी नांदेड व शिक्षण उपसंचालक लातूर यांनी हजर होण्याचे आदेश दि. 13 फेब्रुवारीला निर्गमित केले. ह्या आदेशामुळे शिक्षण विभागात तसेच शाळेतील शिक्षकांमध्ये घबराटीचे वातावरण होऊन प्रस्तावाची सारवा -सारवी करण्यास सुरुवात झाली. आता दि. 18 तारखेला काय चौकशी होईल व कोण दोषी सापडेल व किती जणांना घरी जावे लागते याची चर्चा शिक्षण विभागात होत आहे.

# बारावीच्या भौतिकशास्त्र परीक्षेत सामुदायिक कॉपीचा गंभीर प्रकार उघड

**दैनिक युवक आधार**

**गजानन पवार पाटील/वाशिम :** केंद्र क्रमांक ०९०६ श्री मैनागीरी महाराज कनिष्ठ महाविद्यालय, टो-जुमडाफाटा येथे इयत्ता बारावीच्या भौतिकशास्त्र विषयाच्या परीक्षेदरम्यान मोठ्या प्रमाणावर सामुदायिक कॉपी झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. भरारी पथकाच्या अचानक भेटीत तसेच तपासणीत तब्बल ५८१ विद्यार्थ्यांनी एकसारखी उत्तरे लिहिल्याचे निदर्शनास आले.

दि. १६ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.३० वाजता भरारी पथकाने परीक्षा केंद्राची पाहणी केली. या केंद्रावर एकूण ५८४ विद्यार्थ्यांची नोंदणी असून ५८१ विद्यार्थी उपस्थित होते. प्रत्यक्ष पाहणीत अत्यंत दाटीवाटीची बसण्याची व्यवस्था, टिनशेडमध्ये परीक्षा, अपुरी प्रकाशयोजना, पंखे व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची कमतरता, तसेच वीज खंडित झाल्यास जनरेटरची सुविधा नसल्याचे स्पष्ट झाले. संपूर्ण केंद्रात केवळ ८ सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत होते.

विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांची नमुना तपासणी केली असता बहुसंख्य विद्यार्थ्यांची उत्तरे शब्दशः समान असल्याचे आढळून आले. काही उत्तरपत्रिकांवर वस्तुनिष्ठ प्रश्नांवर पेन/पेन्सिलने खूणा केल्याचेही आढळले.

दरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनीही परीक्षा केंद्रास भेट दिली होती.भरारी पथकाच्या तपासादरम्यान एक कर्मचारी मोबाईल फोन घेऊन परीक्षा केंद्रात फिरत असल्याचे आढळले. मोबाईल तपासणीस टाळाटाळ केल्यानंतर अखेर दोन मोबाईल ताब्यात घेण्यात आले असून पुढील कारवाईसाठी ते संबंधित अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात येणार आहेत.

बैठे पथकातील सदस्यांनीही आपल्या अहवालात उपस्थित ५८१ विद्यार्थ्यांनी सामुदायिक कॉपी केली आहे, असे नमूद केले आहे.भरारी पथकाचा अहवाल, उत्तरपत्रिकांची तपासणी, सीसीटीव्ही फुटेज, अपुऱ्या भौतिक सुविधा आणि संबंधित कर्मचाऱ्याकडे आढळलेले मोबाईल यावरून केंद्र क्रमांक ०९०६ येथे सामुदायिक कॉपी झाल्याचे स्पष्ट होत असून, या प्रकरणी शिक्षण विभागाकडून कठोर कारवाई होण्याची शक्यता असुन संबंधित दोषी कर्मचाऱ्यांविरुद्ध निलंबन व गुन्हा दाखल करण्याबाबतची कार्यवाही सुरू असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली आहे.

# हक्काच्या लढ्याला भावनिक बळ मिळालं तरच लोकस्वातंत्र्य मजबूत – संजय देशमुख

## लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचा मुंबईत भव्य विचारमंथन मेळावा; आनापान साधना मार्गदर्शन व नियुक्तीपत्रांचे वितरण

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : अकोला संघटना ही केवळ संरचना नसून ती सामाजिक परिवर्तनाची प्रेरक शक्ती आहे. हक्काच्या लढ्यासोबत भावनिक सहभाग जपला तरच लोकस्वातंत्र्याची खरी ताकद निर्माण होते. समाजातील समस्यांवर लढा देताना संवेदनशीलता आणि समतेचा विचार जोपासणे हीच मजबूत मानवी साखळी निर्माण करण्याची गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन संजय एम. देशमुख यांनी केले.

लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ चा मुंबई-कोकण विभागाचा ११ वा मासिक विचारमंथन मेळावा टिळक भवन, प्रभादेवी येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगामी महिला दिनानिमित्त मुंबई प्रदेश पत्रकार महिला आघाडी प्रमुख सुषमा ढोले-ठाकूर होत्या.



अध्यक्षीय भाषणात त्यांनी लोकस्वातंत्र्यच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत महिला पत्रकारांच्या सक्षमीकरणासाठी संघटना महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे सांगितले. यावेळी कादंबरीकार पुष्पराज गावंडे, गजानन नागे यांनीही संघटनेच्या वाटचालीचा आढावा घेत अभिनव उपक्रमांची माहिती दिली.कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व संत गाडगे बाबा यांना अभिवादन करण्यात आले. तसेच शहीद जवान, आत्महत्याग्रस्त शेतकरी, अत्याचारग्रस्त महिला व दिवंगत पत्रकारांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.यावेळी आनापान साधना मार्गदर्शक गजानन वाघ यांनी रोगमुक्तीसाठी संतुलित जीवनशैली आणि ध्यानसाधनेचे महत्त्व पटवून दिले. डॉ. भरत सोलंकी व डॉ. हेमांगी सोलंकी यांनी रक्तदाब, विविध व्याधी तसेच महिलांच्या आरोग्य व नैसर्गिक सौंदर्य संवर्धनावर मार्गदर्शन केले.कार्यक्रमात लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाच्या वर्धापन दिनानिमित्त पदाधिकाऱ्यांचा शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. तसेच नव्या सदस्यांना ओळखपत्रांचे वितरण करण्यात आले.या मेळाव्याला कोकण प्रभारी जगदीशप्रसाद करोतिया, ज्ञानेन्द्रकुमार पांडेय, संजय सोळंके, अनिल चासकर, विनोद चाळके, कमलेश कुबल, उमेश चौधरी, विकास भोसले, जबिना शेख, प्रभाकर खरात, भानु जाधव, दिलीप चव्हाण यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास भोसले यांनी केले, तर आभार प्रदर्शन उमेश चौधरी यांनी मानले.लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाच्या माध्यमातून पत्रकारांचे संघटन, आरोग्य जनजागृती, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक प्रश्नांवर सक्रिय भूमिका यामुळे संघटनेची वाटचाल अधिक प्रभावी होत असल्याचे या मेळाव्यात स्पष्ट झाले.

# ३५ वर्षे फक्त आश्वासने; छत्रपती शिवाजी महाराज शिवस्मारक निधीवर मोठा सवाल

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी** : विंचूर लासलगाव शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी गेल्या ३५ वर्षांपासून संकलित करण्यात आलेल्या निधीचा हिशोब अद्याप जाहीर न झाल्याने शिवप्रेमींमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. “आश्वासनांपलीकडे काहीच झाले नाही; निधी नेमका आहे कुठे?” असा थेट सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

सन १९९०-९१ पासून ग्रामपंचायतीमार्फत विविध दाखल्यांच्या वेळी ‘श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती’च्या नावे पावत्या देऊन निधी संकलन करण्यात आले. त्या काळात मोठी रक्कम जमा झाल्याची माहिती देण्यात




आली होती. शासनाच्या आदेशानुसार समितीच्या नावे निधी जमा केल्याचेही सांगण्यात आले; मात्र आजपर्यंत संबंधित खात्याचा तपशील, एकूण जमा रक्कम, व्याजासह सद्यस्थिती याबाबत कोणतीही अधिकृत माहिती जाहीर करण्यात आलेली नाही.

शिवप्रेमींनी मावळ्यांच्या वेशात ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन ग्रामविकास अधिकाऱ्यांना निवेदन दिले. निवेदनात पावती पुस्तके किती छापली, एकूण किती निधी जमा झाला, कोणत्या बँकेत खाते आहे, आणि पुतळा उभारणीबाबत आतापर्यंत काय पावले उचलली, याची सविस्तर माहिती सात दिवसांत जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे.“गेल्या पस्तीस वर्षांत ना पुतळा उभारला, ना हिशोब दिला. पारदर्शकता नसेल तर कायदेशीर मार्गाने आंदोलन छेडले जाईल,” असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.या निवेदनावर संदीप उगले, प्रकाश पाटील, राजेंद्र कराड, प्रमोद पाटील, विकास कोल्हे, धर्मेश जाधव, चंद्रकांत नेटारे, उत्तम वाघ आदींच्या स्वाक्षऱ्या असून, निवेदनाच्या प्रती संबंधित प्रशासकीय व पोलीस अधिकाऱ्यांनाही देण्यात आल्या आहेत.

# गुरुगोविंदसिंहजी महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नांदेड | प्रतिनिधी योगेश चौदंते** : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ संलग्न व जागृती सामाजिक प्रतिष्ठान संचलित श्री गुरुगोविंदसिंहजी महाविद्यालय (बी.जे.), मालेगाव रोड, नांदेड येथे पदवी वितरण समारंभ शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यांकन मंडळाचे संचालक मा. डॉ. ईशारसिंह सावळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जागृती सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास लिंबाजी कदम होते.प्रमुख उपस्थितीमध्ये मा. श्री. विकास तु. कदम (अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई), मा. प्रा. डॉ. शेखर घुंगरवार (प्राचार्य, वसंतराव नाईक कॉलेज, वसरणी नांदेड) तसेच मा. डॉ. देवदत्त देशपांडे (सचिव, श्री नामदेव महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, कंधार) यांचा समावेश होता.समारंभात कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवीधर विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी पारंपरिक शैक्षणिक पोशाख परिधान करून उपस्थित पालक व प्राध्यापकांच्या साक्षीने आपल्या शैक्षणिक यशाचा गौरवशाली क्षण अनुभवला. प्रमुख अतिथी डॉ. सावळे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या पदवीचा समाजहितासाठी उपयोग करावा, असे आवाहन केले. शिक्षण हे केवळ नोकरीसाठी नसून व्यक्तिमत्त्व विकास आणि समाजपरिवर्तनासाठीही महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. विकास कदम यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. पालकांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांचे यश शक्य झाले असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापकांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शनाने समारंभाची सांगता झाली. मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. समारंभ यशस्वी करण्यासाठी महाविद्यालय प्रशासनाने विशेष परिश्रम घेतले.

# पनवेलमध्ये शिर्डी श्री साईबाबांच्या पवित्र पादुकांचा भव्य दर्शन सोहळा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** येथील एच.एस. सद्गुरू श्री साई नारायण बाबा श्री साई मंदिर व श्री साईनारायण बाबा आश्रम येथे शिर्डी साईबाबा यांच्या पवित्र पादुकांचे दर्शन सोहळा बुधवार दिनांक १८ ते शुक्रवार दिनांक २० फेब्रुवारी दरम्यान भक्तिभावात आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यामुळे पनवेल परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण होणार असून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.



बुधवार दिनांक १८ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता श्री साईबाबांच्या पादुकांचे विधीवत स्वागत करण्यात येणार आहे. त्यानंतर दुपारी १ ते रात्री ९ वाजेपर्यंत भाविकांना पादुकांचे दर्शन घेता येणार आहे. सायंकाळी ५ ते ७ या वेळेत भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले असून या शोभायात्रेत मोठ्या उत्साहात सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गुरुवार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ ते रात्री ९ या वेळेत अखंड दर्शनाची व्यवस्था करण्यात आली आहे. याच दिवशी भजन, तसेच महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. शुक्रवार दिनांक २० फेब्रुवारी रोजी सकाळी ७ ते सकाळी १० वाजेपर्यंत पादुकांचे दर्शन ठेवण्यात आले आहे. त्यानंतर श्री साईबाबांच्या पादुका शिर्डी मंदिरकडे प्रस्थान करणार आहेत. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असून सोहळा यशस्वी करण्यासाठी मंदिर व समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्वयंसेवक परिश्रम घेत आहेत. पनवेल व परिसरातील सर्व साईभक्तांनी या पवित्र दर्शन सोहळ्याचा आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सुरगाणा महाविद्यालयात नशा मुक्त विषयावर चर्चासत्र संपन्न

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास कल्याण मंडळा. अंतर्गत महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित सुरगाणा महाविद्यालयात रा.से. यो.विभागामार्फत प्राचार्य डॉ.चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली नशा मुक्त भारत या विषयावर चर्चा सत्र संपन्न झाले.कार्यक्रमाचे प्रथम वक्ते डॉ. बळीराम राम ढेपाळे (समुपदेशक ग्रामीण रुग्णालय सुरगाणा) यांनी सांगितले की नशा म्हणजे मनाला जडलेली सवय तंबाखू,गुटखा, बुका,बीडी, शिगारेट, दारू इ व्यसणाचे मानवी मनावर होणारे शारीरिक, मानसिक, सामाजिक, आर्थिक दुष्परिणाम समजून सांगितले.




कार्यक्रमाचे दुसरे वक्ते डॉ.अक्षय सोनवणे ( नेत्र चिकित्सक ग्रामीण रूग्णालय सुरगाणा) यांनी सांगितले की मानवी शरीर निरोगी ठेवण्यासाठी नशा मुक्त राहणे आवश्यक आहे. मोबाईलचा अतिवापर चॅटिंग करणे,डोळयाजवळ धरणे, संगणक जवळून पाहणे, यामुळे पाठीचे व मानेवर ताण पडतो, सरकारी दवाखान्यात वेळेवर उपचार न केल्यास गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात त्यामुळे दक्ष राहावे लागते असे आवाहन केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा विजय अहिरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आधुनिक काळात ४०% तरूणांनामध्ये व्यसन वाढले आहे.मोबाईल गेम्स वेगवेगळ्या विचार सूचतात. आत्महत्या वाढल्या आहेत, दारूचे व्यसन वाढले आहे. त्यामुळे नेत्र रोग, ह्रदय रोग पोटातील आजार वाढत चालले आहे आयुष्य कमी होते त्यामुळे नेहमी चानाक्ष राहून आरोग्य निरोगी राहाण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे असे सांगितले.

कार्यक्रमात व्यासमुक्तीची शपथ घेण्यात आली. कार्यक्रमाचे दुसऱ्या सत्रात महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचार्यांसह विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सुरगाणा तालुक्यातील नागरिकांना जनजागृती करण्यासाठी व्यासनमुक्ती प्रभात फेरी काढण्यात आली .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुरेश भोये यांनी केले, सुत्रसंचालन प्रा. कविता भोये यांनी केले तर आभार प्रा. भगवान महाले यांनी मानले यावेळी कार्यक्रमाला डॉ. चंद्रकांत पाटील,प्रा. बाळू धुम, प्रा.सुशील पवार, केशव गावित, सुभाष कामडी, डॉ. सविता शिरसाठ,देवचंद कवर, देवीदास साळुंखे, ओमकार धुम यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तिवसा तालुक्यातील शिवणगाव येथे वंचित बहुजन युवा आघाडीच्या शाखेचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**जोत्स्ना करवाडे/विदर्भ संपादक** : काल दिनांक 16/02/2026 रोजी तिवसा तालुक्यातील ग्राम शिवणगाव येथे वंचित बहुजन युवा आघाडीच्या शाखा फलकाचे उद्घाटन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष राहुलभाऊ मेश्राम यांचे हस्ते पार पडले.




शाखा उद्घाटन समारंभ प्रसंगी आयोजित छोटेखानी सभेला जिल्हाध्यक्ष राहुलभाऊ मेश्राम, युवा आघाडी जिल्हा महासचिव सागर भवते यांनी संबोधित केले तर म्हणून उपस्थिती म्हणून तालुका महासचिव मुस्ताक शहा, अनिल सोनाने, युवा आघाडी तालुका महासचिव अमोल जवंजाळ, प्रवीण निकाळजे, तालुका सदस्य अतुल खडसे, नितीन थोरात, प्रदीप सांभारे सह मान्यवर उपस्थित होते.यावेळी शाखा अध्यक्ष आशुतोष इंगळे, उपाध्यक्ष सागर गणेश, सचिव आकाश इंगळे यांच्या ग्रामशाखा कार्यकारिणीला वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी मान्यता देऊन सन्मानित केले.

# हुडकेश्वर पोलीस स्टेशन ऑपरेशन थंडरअंतर्गत घडाकेबाज कारवाई

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/ विदर्भ संपादिका** : येथील हुडकेश्वर पोलीस स्टेशन अंतर्गत एन डी एस २०(ब) या कायद्या अंतर्गत त गुन्हा क्रमांक १०९/२६ कार्यवाही आरोपी विनय दीपक सुनार वय वर्ष 27 राहणार चंद्रगुट्टा, फलकनुमा पॅलेस बालमगुड्डा पो स्टेशन बालमगुड्डा हैदराबाद तेलंगणा. सदर आरोपी विनय दीपक कुमार हा 14 तारखेला आठ ,साडेआठच्या सुमारास संशयितपणे फिरताना दिसत आहे अशी माहिती हुडकेश्वर पोलीस स्टेशनला त्यांच्या गुप्तचर बातमीदाराने दिली त्यावेळी हुडकेश्वर पोलीस स्टेशन व त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांनी मिळून पेट्रोलिंग करत असताना म्हाळगी नगर एनआयटी गार्डन कडे जाणाऱ्या रोडवर आरोपीला थांबून विचारपूस केली असता तो उडवा ओवीचे उत्तर देत होता. टीम ने हार न मानता त्याची कसून चौकशी केली असता त्याने त्याचे जवळ गांजा असल्याचे काबुल दिली. एन डी पी एस कायद्यातील सर्व तरतुदींचे तंतोतंत पालन करून अंग झडती घेतली असता त्याच्या ताब्यातून जप्ती



पंचनामाप्रमाणे १) पांढऱ्या रंगाच्या प्लास्टिक पन्नी मध्ये असलेला गांजा वजन ०.९९८ किलोग्रॅम त्याची किंमत 24 950/-₹ २) दुसऱ्या पांढऱ्या रंगाच्या प्लास्टिक बॅग मध्ये गांजा,०.९९४ किलोग्रॅम, किंमत 24850/-₹,३) हिरव्या रंगाच्या प्लास्टिक पन्नी मध्ये असलेला गांजा, वजन ०.९९३, किंमत 24825/₹ , ४) दुसरे हिरव्या रंगाच्या पण मी मध्ये असलेला गांजा ०.९९५ किलोग्रॅम हिरव्या रंगाच्या पन्नीसह वजन, 24875/_₹ ५) हिरव्या रंगाचे तिसऱ्या पन्नी मध्ये असलेला गांजा ०.९५९ किलोग्रॅम पन्नीसह वजन, 23 975/-₹, ६) छोट्या प्लास्टिक बॅग मध्ये आरोपी याचे खिशातून मिळालेल्या दहा पॅकेट चे वजन०.८९ किलोग्रॅम गांजा पन्नि सह किंमत 225/-₹, असा एकूण ६.०२६ किलोग्रॅम गांजा किंमत 150650,/-₹चा माल मिळाला असून घटनास्थळी जगतीप्रमाणे जप्त करून सदर आरोपी याचे कृत्य कलम 8(क)20(ब) एन डी पी एस कायद्यान्वये पुन्हा होत असल्याने आरोपी विरुद्ध रात्री २:३० च्या सुमारास १५/०२/२६ला गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदरची कार्यवाही माननीय पोलीस उपायुक्त मा रश्मिता रश्मिता राव एन परिमंडळ क्रमांक ४ नागपूर शहर, व मा नरेंद्र हिवरे सहाय्यक पोलीस उपायुक्त अजनी विभाग नागपूर, यांचे मार्गदर्शनाखाली हुडकेश्वर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री हृदयनारायण यादव, सह पोलीस निरीक्षक पपीत रामटेके, व तपास अमलदार पोलीस हवालदार बजरंग जुनघरे, गोपाल देशमुख, संदीप पाटील, दिनेश गाडेकर, चेतन वैद्य, ना पो अंमलदार विजय सिन्हा, पो अंमलदार गौरव गजभिये, मंगेश मडावी, आणि प्रज्वल वाणी यांनी केली

# घरकुलासाठी कातकरी कुटुंबांचे पंचायत समितीत ठिय्या आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी** : निफाड तालुक्यातील दात्याने येथील कातकरी समाजातील १५ कुटुंबांनी घरकुल मिळावे या मागणीसाठी बाड - बिस्तरासह सोमवारी निफाड पंचायत समिती प्रांगणात लक्षवेधी ठिय्या आंदोलन केले.



घरकुल मिळावे यासाठी तीन वर्षांपासून शासन स्तरावर पाठपुरावा करूनही कोणताही निर्णय न झाल्याने कातकरी समाजातील कुटुंबांनी संताप व्यक्त करत पंचायत समितीच्या प्रांगणातच ठिय्या आंदोलन सुरू केले. आंदोलनकर्त्यांनी आपल्या बाड - बिस्तरासह तिरंगा झेंडा घेऊन परिसरात ठिय्या मांडला. दात्याने येथील आदिम कातकरी समाजातील कुटुंबे अनेक वर्षांपासून झोपड्या बांधून वास्तव्यास आहेत. 'जन मन' योजनेतून घरकुल मंजूर असल्याचे त्यांनी सांगितले. राहत्या झोपडीखालील जागा आमच्या नावे व्हावी यासाठी तहसीलदारांकडे दावे दाखल केले असून वनजमिनीत निवासासाठी जागा मिळावी म्हणून ३/२ चा प्रस्ताव सादर केला आहे. मात्र त्यावर अद्याप निर्णय न झाल्याने उघड्यावर राहण्याची वेळ आल्याचे आंदोलनकर्त्यांनी निवेदनात नमूद केले.तुटपुंजे भांडे, लाकूड तसेच घरगुती सामान घेऊन मुलाबाळांसह ही १५ कुटुंब सोमवारी सकाळी पंचायत समितीत दाखल झाली. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी प्रांगणातच ठिय्या मांडला.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त वाशिममध्ये भव्य रक्तदान शिबिर

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी** :वाशिम येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती वाशिम–२०२६ व राजे छत्रपती ब्लड डोनर ग्रुप वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत हे शिबिर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आयोजित करण्यात आले आहे.




छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त समाजोपयोगी उपक्रम म्हणून या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. रक्तदान हे श्रेष्ठ दान मानले जात असल्याने नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.या रक्तदान शिबिराचे मुख्य संयोजक म्हणून अजय मोतीवार, संध्या संभाजिंदे व भूषण देशपांडे हे कार्य पाहत असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिवप्रेमी युवक व सामाजिक कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

तसेच या उपक्रमासाठी विनीत म्हणून प्रतिक कांबळे, गौरव शेख माजिद, दिलीप भेंडेकर, ओम फड, आयुष वानखेडे, भूषण मोरे, श्यामराव धाडवे, सचिन कोतीवार, मंगेश वानखेडे, गणेश इंगोले व गोविंद धोत्रे यांनी सहकार्य केले असून, शिबिराच्या यशस्वीतेसाठी सर्वजण परिश्रम घेत आहेत.शिवजयंतीनिमित्त आयोजित या समाजोपयोगी उपक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# ई-केवायसीतील चूक दुरुस्तीसाठी शासनाची संधी; मुदखेडमध्ये घरोघरी ई-केवायसी मोहीम

**दैनिक युवक आधार**
**नांदेड | प्रतिनिधी/ विश्वदीप कांबळे** : लाडकी बहीण योजनेअंतर्गत ई-केवायसी (e-KYC) करताना तांत्रिक अथवा माहितीतील त्रुटीमुळे ज्या लाभार्थी महिलांचा नोव्हेंबर व डिसेंबर महिन्याचा हप्ता जमा झाला नव्हता, अशा सर्व लाडक्या बहिणींना शासनाच्या वतीने चूक दुरुस्तीसाठी विशेष संधी देण्यात आली आहे.या



संधीचा लाभ कोणतीही लाभार्थी महिला वंचित राहू नये, यासाठी नितीन बाबुराव चौदंते, प्रभाग क्रमांक ४ चे नगरसेवक प्रतिनिधी, यांनी पुढाकार घेत मुदखेड शहरात घरोघरी जाऊन ई-केवायसी करून देण्याचा संकल्प जाहीर केला आहे. या उपक्रमामुळे संबंधित महिलांना पुन्हा लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.शहरातील विविध प्रभागांमध्ये घरोघरी भेट देत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून दिली जात आहे. या मोहिमेस रेखा नितीन चौदंते, नगरसेवक तथा महिला व बालकल्याण सभापती, यांचेही सहकार्य लाभत आहे.आतापर्यंत प्रभाग क्रमांक २, ३, ४, ७, ९ व १० मधील लाडक्या बहिणींची ई-केवायसी एकदाच पूर्ण करण्यात आली आहे. उर्वरित प्रभागांमधील ई-केवायसी ३० मार्चपर्यंत पूर्ण केली जाणार असल्याची माहिती आयोजकांच्या वतीने देण्यात आली आहे.या उपक्रमात महावीर चौदंते, मोती भिसे, गजानन सुरले, दयानंद हनवते व रोहन चौदंते यांनी सहकार्य केले आहे. संबंधित सर्व लाडक्या बहिणींनी या विशेष संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



**महाविस्तार अँप चा प्रचार करताना कृषी सहायक तनपुरे ,विमा कंपनीचे शेख व दैनिक युवक आधारचे घनसावंगी तालुका प्रतिनिधी एकनाथ जाधव हे शेतकऱ्यांना शेतात जाऊन ॲपची माहिती देताना घेतलेले**
**(छायाचित्र..छाया- अशोक ठोके दैनिक युवक आधार)**

# डोक्यात दगड घालून इसमाची हत्या: परिसरात खळबळ

**दैनिक युवक आधार**
**पनवेल दि.१७(वार्ताहर):** पनवेल शहराजवळील गांधी हॉस्पिटल समोरील उड्डाणपुलाखाली अज्ञात कारणावरून एका इसमाच्या डोक्यात दगड घालून हत्या केल्याची घटना सोमवारी मध्यरात्री घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.शहराजवळील गांधी हॉस्पिटल समोरील उड्डाणपुलाखाली विजय (पूर्ण नाव माहित नाही) अंदाजे वय ३७-३८ वर्षे हा नेहमी त्या ठिकाणी नाका कामगार येथे कामासाठी उभा राहत असे व प्रामुख्याने कॅटरिंगची पडेल ती कामे करत असे, तसेच त्याला देशी दारू पिण्याचे व्यसन होते. सोमवारी रात्री अज्ञात कारणावरून अज्ञात इसमाने त्याच्या डोक्यात दगड घालून त्याची निघृण हत्या केली व तेथून



तो पसार झाला आहे. या घटनेची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळताच त्यांनी तात्काळ पोलीस उपयुक्त प्रशांत मोहिते, सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांना माहिती दिली तसेच वपोनि नितीन ठाकरे यांच्यासह गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी घटनास्थळी रवणा झाले असून त्यांनी हा , खून कोणत्या कारणावरून झाला असे याचा शोध घेत आहेत.

# खारघरमध्ये बेकायदा बांधकामांवर कारवाई

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**
सिडकोच्या अनधिकृत बांधकाम विभागातर्फे खारघर आणि लॉजिस्टिक पार्क परिसरात अनधिकृत बांधकामांवर सिडकोने बुलडोझर फिरवला आहे. दोन दिवसांत मोठी कारवाई करून परवानगी न घेता उभारलेली दुकाने, वॉशिंग सेंटर, ढाबा, कंटेनर कार्यालये आणि शेड्स पाडण्यात आली.खारघरमधील सेक्टर ३५ आय, ३५ डी आणि ३५ ई भागात कारवाई झाली. येथे बांबू शेडमध्ये सुरू असलेली एकूण १९ व्यावसायिक दुकाने आणि एक वॉशिंग सेंटर हटविण्यात आले. कॉर्पोरेट पार्कसाठी राखीव असलेल्या भूखंडावर उभारलेला ढाबाही पाडण्यात आला. तसेच फुटपाथवर सुरू असलेली दुकानेही हटवण्यात आली. ही सर्व बांधकामे सिडकोची परवानगी न घेता उभारण्यात आली होती. त्यामुळे ती हटविण्याची कारवाई करण्यात आल्याचे सिडको प्रशासनाने स्पष्ट केले.

# लग्न जुळविणाऱ्या साइटवरून ओळख; महिलेवर बलात्कार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल दि.१७(वार्ताहर):** लग्न जुळविणाऱ्या वेबसाइटवरून एका महिलेशी ओळख वाढवून तिला लग्नाचे खोटे आमिष दाखवित तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. तसेच या महिलेची सुमारे १२ लाखांची आर्थिक फसवणूकही करण्यात आली आहे. अक्षय पाटील (३३) असे या प्रकरणातील आरोपीचे नाव असून कामोठे पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या आहेत.या घटनेतील ३२ वर्षीय पीडित महिला कामोठे येथे राहण्यास असून आरोपी अक्षय हा पनवेलमधील करंजाडे परिसरात राहण्यास आहे. हे दोघेही घटस्फोटीत असून या दोघांनी एका मॅट्रिमोनिअल वेबसाइटवर लग्नासाठी नोंदणी केली होती. नोव्हेंबर २०२५ मध्ये आरोपी अक्षयने पीडित महिलेशी ओळख वाढवून तिच्याशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानंतर त्याने पीडित महिलेचा विश्वास संपादन करत, तिला लोणावळ्यातील हॉटेलमध्ये, कामोठे सेक्टर १४ या ठिकाणी नेऊन तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. तसेच त्याने व्यवसायासाठी आणि वैयक्तिक अडचणींचे कारण सांगून पीडित महिलेकडे वेळोवेळी पैशांची मागणी केली. त्याने पीडितेला तिच्या नावावर बँकेचे कर्ज काढण्यास भाग पाडले. त्यातून आलेली रक्कम त्याने स्वतःसाठी वापरली. अशा प्रकारे अक्षय याने पीडित महिलेची एकूण ११ लाख ९२ हजार ९०० रुपयांची फसवणूक केली. ही फसवणूक लक्षात येताच पीडित महिलेने रविवारी कामोठे पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# छ. शिवरायांचे स्वराज्य हा बहुजनांच्या राजसत्तेचा पाया

आपल्या भारतीय माणसाला इतिहासातून बोध घेवून वर्तमान काळात वाटचाल करण्याची जसी सवय नाही तसेच, भूतकाळाची वर्तमान कळासी सांगड घालून जीवन जगण्याचीही सवय नाही. यामुळे भारतीय माणसाचा बराच वेळ हा देवदैवते व त्यांची उपासना आणि त्यांच्या नावावर माजवलेल्या कर्मकांडाचे स्तोम यांची पूर्तता करण्यातच जातो. यामुळे आपल्या देशात फक्त महपुरूषांचा जयघोष करून त्यांच्या जयंत्या व पुण्यतीथ्या भरवल्या जातात. पण त्यातून बोध मात्र कोणताच घेतला जात नाही हे विशेष आहे. एवढेच नाही तर प्रत्येक महापुरुष व संत यांच्या जयंत्या व पुण्यतीथ्या त्या त्या महापुरुषांचे जातबांधव भरवतात हे त्यावरूनही मोठे विशेष आहे. छ.शिवरायांनी स्वराज्य उभारले व महाराष्ट्रीयन जनतेला स्वाभिमानाचे शासन दिले. हि ऐतिहासिक शासन वेवस्था सुद्धा आज रयतेचे म्हणजे बहुजनांचे की हिंदवी म्हणजे हिंदूचे या वादाच्या भोव-यात सापडलेली आहे. एवढेच नाही तर याच छ. शिवरायांचे सुपुत्र छ. संभाजी महाराज यांचा वध हा रयतेच्या बहुजन राज्यासाठी होता की हिंदवी हिंदूच्या राज्यासाठी होता यावरूनही वाद आहेत. म्हणजेच छ.शिवरायांच्या स्वराज्याचा व त्यांच्या कार्यकर्तूत्वाचा संपूर्ण इतिहासच आपण ऐतिहासिक भूमिकेतून न पहाता तो धर्माच्या विचारप्रणालीतूनच आजपर्यंत आभ्यासला हे स्पष्ट दिसून येते. म्हणजेच थोडक्यात आपण धर्मनिरपेक्ष असणार-या छ. शिवरायांना ऐतिहासिक भूमिकेतून नाही तर आजपर्यंत धार्मिक भूमिकेतूनच अभ्यासले. म्हणून छ.शिवराय हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत होते असे म्हणण्याची वेळ आपल्यावर आणली गेली आहे. पण छ.शिवराय हे धर्मनिरपेक्ष महापुरुष होते असे कधीच आपण म्हणलो नाही याचे विशेष वाटते व यावरून आपल्याला इतिहासाचे ज्ञान किती हेही समजून येते. यामुळे चूकीचा इतिहास नेहमीच जन्मास येणाऱ्या प्रत्येक पिढीवर स्थापण्यात आला व त्याच भूमिकेतून छ. शिवरायांना नेहमीच वादाच्या भोव-यात ठेवण्यात आपण यशस्वी झालो असे म्हणल्यास ते वावगे ठरणार नाही. छ. शिवरायांनी रयतेचे स्वराज्य उभारले व त्याचा राज्यरोहण सोहळाही साजरा केला हा इतिहास झाला. पण छ.शिवरायांचे हे स्वराज्य खरच फक्त हिंदूचेच होते का? छत्रपतींच्या सैन्यात फक्त हिंदू सैनिकच होते का? असे जर होते तर मुस्लिम, पठाण हे कोण होते? तसेच बाराबलुतेदार व आदिवासी यांचा भरण छत्रपतींच्या सैन्यात नव्हता का? नव्हता असे ग्राह्य धरले तर बहिर्जी नाईक, जीवा महाला, बाजी प्रभु हे कोण होते? उलट शिवरायांच्या सैन्यात ५७% मुस्लिम व पठाण सैन्य होते हे जेष्ठ इतिहासकार श्रीमंत कोकाटे हेच त्यांच्या पुस्तकात सांगतात. मग ऐतिहासिक प्रश्न हा उत्पन्न होतो की, मग उरलेल्या ४३% सैन्यात आजचे मराठा जातबांधव किती? कारण त्यावेळी मोगली राजाच्या सरदारक्या व जहागि-या कोणते मराठा बांधव उपभोगित होते व आजही त्याच तो-यात ते का वागताना दिसतात? आणि तेच आज आम्हीच शिवरायांचे वंशज आहोत असे ओरडून का सांगत



आहेत? या सर्वच प्रश्नांचा शोध घेतला तर छ.शिवरायांच्या पाठीमागे खंबीर पद्धतीने स्वराज्य उभारण्यास उभे राहिले ते बहुजन ओबीसी,आदिवासी व मुस्लिम असा छ.शिवरायांचा पराक्रमी इतिहासच साक्ष देतो. स्वराज्य उभारणीसाठी छ.शिवरायांनी महाराष्ट्रातील सर्वच बहुजन समाजाला एकत्रित करून त्यांच्यावर स्वराज्याचे अमृत शिंपडले होते. म्हणजेच सर्वांना संगती घेऊन स्वराज्य निर्मिती करता येते याचा पायाच छत्रपतींनीं स्वकर्तृत्वाने घालून दिला होता. तसेच हे स्वराज्य उभारताना छ.शिवरायांनी ' ज्याची जेवढी योग्यता तेवढीच त्याची जबाबदारी ' या तत्वानुसार सोशल इंजिनियरिंगच्या माध्यमाने त्यांनी राज्य कारभार केला होता. म्हणून स्वराज्य उभारणी झाली व छत्रपतींच्या नावाने इतिहास रेखाटला गेला व तो प्रेरणादायीही ठरला. पण खरच आपण बहुजनांनी यातून प्रेरणा घेतली का? हा प्रश्न परत उपस्थित होतो. कारण जर खरच आपण बहुजनांनी छ.शिवरायांना प्रेरणास्थानी मनापासून मानले असते तर, आपणच आपला महाराष्ट्र पशवे पद्धतीने राज्यकारभार करणा-या पक्षाच्या ताब्यात दिला नसता व आपण बहुजन व बहुजनांचे नेते पेशवे धार्जिन्या पक्षाच्या पालखीचे भोई झालेच नसते. बरे हे एकदाच झाले असे नाही. तर याच सत्तेची पहिली आवृत्ती १९९४ ला शिवसेनेने महाराष्ट्रावर भगवा फडवून केली होती. तरी आपण व आपल्या राजकर्त्यांनी यातून कोणताच बोध घेतला नाही कि काळाची पाउलेही ओळखली नाहीत. पण आजही महाराष्ट्र बहुजन जनता मराठा समाजाला आपला मोठा भाऊ माणून त्यांना राजकारणात सहाय्य व मदत करतच आहे. अशीच मदत ते मराठा नेतृत्वाला महाराष्ट्र निर्मिती पासून करतच आलेलीही आहेत. पण या योगदानाची मराठा नेत्यांनी कधी कदर केली नाही. उलट याच मराठा मुख्यमंत्र्यांच्या काळातच डॉ. आंबेडकरांच्या रिडल्सची होळी, आदिवासींचे गोवारी हत्याकांड, दलितांचे रमाबाई नगर व खैरलांजी हत्याकांड झाले आणि आज मराठा बांधव व ओबीसी बांधव आरक्षणावरून आमणे सामणे आहेत. मग प्रश्न हा उपस्थित होतो की, मराठा समाजाने आपल्या क्षत्रियत्वाच्या नकली बुरख्याखाली कोणता मागासवर्गीय बहुजन समाज घटक जपला व त्याची आपल्यापरिने जोपासना केली? यामुळे आज महाराष्ट्रातील राजकारणात मराठ समाज विरूद्ध मागासवर्गीय समाज असे राजकीय चित्र निर्माण झालेले आहे. यामुळेच मराठा राजकारणाला गळती लागली हेही अनेक कारणांपैकी एक कारण आहे. पण जर कधी या मराठा राजकारणयांनी छ. शिवरायांप्रमाणे बहुजन मागासवर्गीय समाजाचे वेळीच राजकीय पाऊले ओळखून मागासवर्गीय बहुजन समाजाचे रक्षण केले असते तर, आज महाराष्ट्रात राजकीय चित्र वेगळे असते. उलट त्यांच्याच जीवावर लोकशाहीतही आपली सत्तास्थाने टिकवण्यासाठी बहुजन मागासवर्गीय समाजाचा पायपुसण्या सारखा वापर करून घेतला. पण हा करून घेताना एक गोष्ट येथे कायमची नमूद करून ठेवावीशी वाटते, ती म्हणजे हे मराठा राजकारणी नेहमीच मागासवर्गीय समाजाला दूय्यम व आपली रयत म्हणजे गुलाम समजत आली व पेशवे धार्जिण्या ब्राम्हण वर्गाला आपले मालक समजत आली व या मानसिकतेतूनच त्यांनी आपले राजकारणही केले व राजसत्ताही टिकवली. म्हणजेच मागासवर्गीय बहुजनांना लात व ब्राम्हणी राजकर्त्यांना साथ असे त्यांचे राजकारण होते. म्हणूनच ते आज आपल्या साडेतीन टक्क्याच्या मालकांपूढे गुडघे टेकून व माना खाली घालून, फेकलेल्या सत्तेच्या टूकड्यावर आपली राजकीय सत्ता गोंजारत आहेत. पण जर कधी छ.शिवरायांचा धर्मनिरपेक्ष विचार अंगीकारून समतेच्या नजरेने मागासवर्गीय बहुजन समाजाकडे पाहून राजकारण केले असते तर, आज मराठा समाजा बरोबरच मागासवर्गीय बहुजन समाजाला हे दिवस आले नसते व हि वेळ पहायलाही मिळाली नसती. उलट छ. शिवरायांनी स्वराज्य स्थापनेचा घातलेला पाया यातून प्रेरणा घेऊन व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानात त्याचे रूपांतर करून जर कधी, महाराष्ट्रात मराठा समाजाने राजकारण केले आसते तर, महाराष्ट्र हा कधीच पेशव्यांच्या ताब्यात गेला नसता व मराठा नेत्यांनाच पेशव्यांची धोतरे धुण्याची वेळ त्यांच्यावर आली नसती. पण छ.शिवराय व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची नाळ मराठा नेत्यांना आजपर्यंत न जोडता आल्याने हे सारे राजकारण फसले आहे. म्हणजेच मराठा समाजाला छ.शिवराय व डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून घ्यायला जेवढा वेळ लागेल, तेवढेच छ.शिवरायांच्या स्वराज्याचे स्वप्न लांबेल यात शंकाच नाही. पण हे महाराष्ट्रीयन बहुजन समाजाच्या दृष्टीने घातक आहे. कारण राजकारणात थांबला तो संपला असे भाकित असते. तेंव्हा निदान महाराष्ट्रीयन वंचित बहुजन समाजाने तरी छ. शिवराय व डॉ. भिमराय यांच्या विचारांची काळाची पावले ओळखून राजकीय पटलावर एकत्रित येणे गरजेचे आहे. ' जिसकी जीतनी भागीदारी उसकी उतनी जिम्मेदारी ' या तत्वाने वंचित बहुजनांची एकत्रित मोट बांधून निदान महाराष्ट्राची तरी शासनकर्ती जमात बनावे. हिच छ.शिवरायांच्या जयंती दिनी व राष्ट्रपिता ज्योतिबा फुले जयंती दिनी आणि येत्या डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती दिनी या महामानवांना ही मानवंदना ठरेल. कारण छ. शिवराय हे आपल्या बहुजन मागासवर्गीय समाजाचे स्वराज्य स्थापनेचा प्रेरणास्रोत आहे. तर राष्ट्रपिता फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या प्रेरणेची परिपूर्ती आहे. हे कायम मागासवर्गीय बहुजन समाजाने लक्षात ठेवावे.

# श्रीवर्धनमध्ये कायमस्वरूपी रोजगार निर्मितीची गरज; पावसाळ्यात अर्थचक्र होते ठप्प

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित :** श्रीवर्धन तालुक्यात दरवर्षी पावसाळा सुरू झाला की स्थानिक अर्थचक्र अक्षरशः थांबते. पर्यटन हा मुख्य व्यवसाय असल्याने समुद्रकिनारे, रिसॉर्ट, हॉटेल, होमस्टे, बोटिंग यांसारख्या उपक्रमांवर मोठ्या प्रमाणात परिणाम होतो. मुसळधार पावसामुळे पर्यटकांची संख्या घटते आणि अनेक व्यावसायिकांना व्यवसाय बंद ठेवावा लागतो.

याचबरोबर मत्स्य व्यवसायावरही पावसाळ्यात निर्बंध येतात. मासेमारी बंद हंगामामुळे मच्छीमार बांधवांना उत्पन्नाचे साधन राहत नाही. परिणामी, स्थानिक तरुण व कामगार वर्गासाठी रोजगाराच्या संधी अत्यंत मर्यादित होतात. अनेक कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो.

स्थानिक नागरिकांच्या मते, केवळ हंगामी पर्यटनावर अवलंबून राहणे ही मोठी जोखीम आहे. त्यामुळे प्रशासन व लोकप्रतिनिधींनी तातडीने पर्यायी उद्योग, लघुउद्योग व कौशल्याधारित प्रकल्प उभारण्यावर भर देणे गरजेचे आहे. मत्स्यप्रक्रिया उद्योग, कोकणातील फळांवर आधारित प्रक्रिया उद्योग, हस्तकला, घरगुती उद्योग, तसेच ऑनलाईन सेवा केंद्रे यांसारख्या संधी विकसित केल्यास वर्षभर रोजगार उपलब्ध होऊ शकतो.

तज्ज्ञांच्या मते, पावसाळ्यात चालू राहतील असे प्रशिक्षण कार्यक्रम, स्वयंरोजगार योजना आणि शासनाच्या विविध योजनांचा प्रभावी वापर केल्यास परिस्थितीत बदल घडवून आणता येऊ शकतो. स्थानिक स्वराज्य संस्था, व्यापारी संघटना आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्र येऊन दीर्घकालीन रोजगार आराखडा तयार करणे ही काळाची गरज आहे.

श्रीवर्धनच्या आर्थिक स्थैर्यासाठी तात्पुरत्या उपाययोजना नव्हे, तर कायमस्वरूपी रोजगार निर्मितीचा ठोस रोडमॅप आवश्यक आहे. पावसाळा म्हणजे बेरोजगारीचे दिवस अशी स्थिती बदलण्यासाठी आतापासूनच नियोजन व कृती होणे अत्यावश्यक आहे.

# सामाजिक उपक्रमाने शांततेत शिवजयंती साजरी करा - डीवायएसपी रामेश्वर रेंगे

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके)** : छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती शांततेत व सुव्यवस्थेत तसेच सामाजिक उपक्रम राबवत साजरी करा असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांनी केले परतुर पोलीस स्टेशनच्या वतीने आयोजित शांतता समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पोलीस निरीक्षक सुदाम भागवत नगराध्यक्ष यांचे प्रतिनिधित्व म्हणून शहाजी राक्षे माजी उपनगराध्यक्ष विजय राखे आदींची उपस्थिती होती. यावेळी आपल्या अध्यक्षीय समारोपात पुढे बोलताना रामेश्वर रेंगे यांनी उपस्थित नागरिक व शिवप्रेमींना आवाहन करताना पुढे म्हटले की शांतता व एकोपा याचे दर्शन प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी अपेक्षित असून शिवजयंती उत्सव समितीने याची काळजी घ्यावी अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या तसेच शिवजयंती मिरवणुकीमध्ये दारू पिऊन धुडघुस घालणाऱ्यांची अजिबात गय केली




जाणार नाही असा इशारा त्यांनी यावेळी दिला.काही अनुचित प्रकार आढळल्यास कडक कारवाईचा इशारा त्यांनी यावेळी दिला महापुरुषांचा जयंती उत्सव साजरा करताना संबंधित उत्सव समितीच्या वतीने विविध उपक्रम आयोजित करणे अपेक्षित असून जेणेकरून समाजाला त्यातून काहीतरी चांगला संदेश मिळेल असे कार्य करणे गरजेचे आहे म्हणून डीजे वर अनर्थ खर्च घालण्यापेक्षाआरोग्य व रक्तदान शिबिरा सारखे उपक्रम रावबत पदाधिकाऱ्यांनी समाजहिताचे कार्य करावे असे आहवन त्यांनी यावेळी केले.

दरम्यान आपल्या मनोगतात पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांनी म्हटले कि येणारी शिवजयंती व मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना शांततेत व सुव्यवस्थेत पार पाडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज आहे मात्र नागरिकांनी पुढाकार घेऊन. येणारे सण उत्सव आनंदात साजरी करावी अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. शिवजयंती मिरवणुकीमध्ये शिस्तपणा व ऐक्याचे दर्शन दाखवत पदाधिकाऱ्यांनी सर्वांना सोबत घेऊन हा उत्सव साजरा करावा अशा भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

दरम्यान यावेळी अनेकांनी आपल्या मनोगतामध्ये शहरातील समस्या बाबत तक्रारी केल्या, यात शहरात रस्त्यावर लोम्बकाळणाऱ्या विद्युत तारा व काही गल्लीबोळातील खराब रस्ते व अस्वच्छता या कारणामुळे शिवजयंतीच्या मिरवणुकीत कुठे अडथळा येऊ नये याची खबरदारी प्रशासनाने घ्यावी व संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत सूचना द्याव्यात असे सूचक मत अनेकांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले.

त्याला उत्तर देताना प्रशासनाच्या वतीने सुदाम भागवत यांनी संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत सूचना केल्या. यावेळी मोठ्या संख्येने सामाजिक कार्यकर्ते व विविध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची व नगरसेवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार अजय देसाई यांनी केले तर आभार पोलीस विभागाच्या वतीने विजय जाधव यांनी मानले.

# डिजिटल शिक्षणाची' नवी मशाल नवीन शेवे येथील चैताली म्हात्रे ठरल्या रायगड 'डिस्ट्रिक्ट विनर 'अलिबाग मध्ये दिमाखदार गौरव

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** शाळा ही केवळ इमारत नसते तर विद्यार्थ्यांच्या भविष्याचा पाया असते ,हा पाया अधिक भक्कम करण्यासाठी तंत्रज्ञानाची जोड देत रायगड जिल्हा परिषद शाळा नवीन शेवे येथील उपशिक्षिका सौ.चैताली राकेश म्हात्रे यांनी आपल्या कर्तुत्वाने सातासमुद्र पार नव्हे तर डिजिटल विश्वात रायगडचा डंका वाजवला आहे. त्यांच्या या शैक्षणिक धडपडीची दखल घेत 'ओपन लिंक फाउंडेशन' मार्फत चालवल्या जाणाऱ्या आचार्य विनोबा भावे ॲपच्या माध्यमातून त्यांचा अलिबाग येथे गौरव करण्यात आला.रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मा. नेहा भोसले मॅडम आणि प्राथ. शिक्षणाधिकारी मा. ललिता




दहीतुले मॅडम यांच्या शुभहस्ते हा सन्मान सोहळा संपन्न झाला. एका ध्येयवेढ्या शिक्षिकेच्या कामाचे कौतुक जेव्हा जिल्ह्याच्या सर्वोच्च पदाधिकाऱ्यांकडून होते तेव्हा तो क्षण केवळ एका व्यक्तीचा उरत नाही तर संपूर्ण शिक्षण विभागाचा अभिमान ठरतो. सौ चैताली म्हात्रे यांनी विनोबा ॲपचा वापर केवळ कर्तव्य म्हणून नाहीतर विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे माध्यम म्हणून केला आहे .त्यांनी अपलोड केलेले शैक्षणिक व्हिडिओ आणि नाविन्यपूर्ण उपक्रम हे इतर शिक्षकांसाठीही प्रेरणादायी ठरले आहेत. या प्रवासाची सुरुवात केंद्र स्तरावरील पुरस्काराने झाले त्यानंतर उरण तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी सौ निर्मला घरत मॅडम यांच्या शुभहस्ते तालुका स्तरावरील( ब्लॉक लेवल ) सन्मान मिळाला आणि आता जानेवारी महिन्याच्या जिल्हास्तरीय विजेत्या म्हणून त्यांच्या कार्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. एखादा शिक्षक जेव्हा स्वतःच्या कौटुंबिक जबाबदारी सांभाळून शाळेतील मुलांसाठी नवनवीन प्रयोग करतो तेव्हा तो खऱ्या अर्थाने समाजाचा शिल्पकार ठरतो. चैताली म्हात्रे यांनी मिळवलेले हे यश त्यांच्या जिद्दीचे चिकाटीचे आणि तंत्रस्नेही असण्याचे फळ आहे. त्यांच्या यशाबद्दल उरण तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे. तंत्रज्ञानाच्या या युगात 'विनोबा ॲपच्या' माध्यमातून त्यांनी शिक्षणाची ज्योत अधिक प्रज्वलित केली आहे.

# संत अमरदास बाबा पालखी सोहळा उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**रिसोड /प्रतिनिधी/रणजित. ठाकूर :** रिसोड शहरात महाशिवरात्री निमित्त १६ फेब्रुवारी रोजी संत अमरदास बाबा यांची पालखी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी उत्साहात निघाली यावेळी बँड बाजे टाळांचा गडगडाहाट भक्ती गीत,फटाक्यांच्या आतिषबाजीने अवघे शहर दुमदुमले होते.

मागील अनेक वर्षापासून ह्या पालकीची परंपरा असून दरवर्षी अन्य जिल्ह्यातून भक्त पालकी मध्ये सहभागी होतात. पालकी मंदिरातून निघत जमा मस्जिद चौक, आसनगल्ली, छत्रपती शिवाजी चौक,नवीन सराफा लाईन, बबेरवाल चौक,पंचवाट मार्ग,अष्टभुजा देवी चौक,मार्ग परत मंदिरात स्थानापन्न होते. पालकी मधील सहभागी भक्तांसाठी विविध सामाजिक संघटनेच्या वतीने पालकी मार्गावर फराळ, चहा,शरबतीची व्यवस्था केली गेली होती. संत अमरदास बाबा यांची आरती नंतर मंदिरात दहीहांडी कार्यक्रम होतो. परिसरात



महाप्रसाद होतो त्यांचा लाभ हजारो भाविक घेतात. संत अमरदास बाबा यांचे मंदिराच्या गाभाऱ्यातील समाधीचा जलाभिषेक वर्षातून महाशिवरात्री व पोळा या दोनच वेळा भक्तांना करता येतो महाशिवरात्रीचे पर्वावर मंदिरात मोठी गर्दी असते संस्थांनचे वतीने यात्रेचे आयोजन सुद्धा केल्या जाते ही १५ दिवस चालते यात्रेमध्ये महाराष्ट्रसह इतर राज्यातील भक्तगण दरवर्षी येतात.

# डिजिटल क्रांतीची ग्रामशाळेत एन्ट्री!”

## पंगडी येथील जिल्हा परिषद शाळा बनली पूर्णतः ‘स्मार्ट’ – चार वर्गखोल्यांचा तांत्रिक कायापालट

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेन्दोर :** ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत पंगडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने प्रगत शैक्षणिक वाटचालीकडे मोठे पाऊल टाकले आहे. शाळेचा संपूर्ण कायापालट करून ती आता पूर्णतः ‘स्मार्ट’ स्वरूपात विकसित करण्यात आली असून, परिसरात या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ग्रामपंचायतीच्या सहकार्याने शाळेतील चार वर्गखोल्या अत्याधुनिक पद्धतीने सुसज्ज करण्यात आल्या आहेत. प्रत्येक वर्गात बहुउद्देशीय दूरदर्शन संच बसविण्यात आला असून, त्याद्वारे शिक्षकांना अध्यापन अधिक प्रभावी आणि रंजक पद्धतीने करता येत आहे.

फळा, नकाशा, त्रिमिती नमुने, चलतचित्रे, आंतरजालावरील माहिती तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा एकत्रित वापर करून विद्यार्थ्यांच्या संकल्पना अधिक स्पष्ट केल्या जात आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील




विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची दारे खुली झाली असून ते जागतिक स्पर्धेसाठी सज्ज होत आहेत. दि.१३ फेब्रुवारी २०२६ रोजी या चारही डिजिटल प्रयोगशाळांचे उत्साहात उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी सरपंच सौ. छायाताई चिंचोलकर, उपसरपंच प्रमोदभाऊ कदम, ग्रामपंचायत अधिकारी सौ. वर्षाराणी कोलते, मुख्याध्यापक रमेश उदार, तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष वैभव भोयर उपस्थित होते.

यावेळी गावातील मान्यवर देवराव भोयर, महादेव भोयर, विठ्ठल धांदे तसेच ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी पदवीधर शिक्षक राठोड सर, उपशिक्षक सोनुले सर आणि देशमुख सर यांनी विशेष परिश्रम घेतले. या डिजिटल परिवर्तनामुळे पंगडी परिसरातील पालक व विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, शिक्षणाच्या गुणवत्तेत लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# पालोदचे शिवार न्हाले 'सुवर्ण' रंगात; आम्रवृक्षांवर निसर्गाची अक्षय 'मोहर'!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :-**निसर्ग जेव्हा मुक्तहस्ताने सौंदर्याची उधळण करतो, तेव्हा धरणीमातेचे रूप किती लोभस असू शकते, याचा प्रत्यय सध्या सिल्लोड तालुक्यातील पालोदच्या शेतशिवारात येत आहे. एरवी कापूस आणि मक्याच्या पिकांसाठी ओळखल्या जाणाऱ्या या मातीत यंदा निसर्गाचा एक आगळावेगळा चमत्कार पाहायला मिळत असून, शिवारातील प्रत्येक आम्रवृक्ष जणू सुवर्णरंगाच्या मोहोराने न्हाऊन निघाला आहे. बांधावरच्या झाडांपासून ते शेतातील बागांपर्यंत सर्वत्र यंदा आंब्याचा 'राजेशाही' बहर पाहायला मिळत असून, संपूर्ण पालोद परिसर या मोहोराच्या मंद सुगंधाने दरवळून गेला आहे.

फेब्रुवारीच्या कोवळ्या उन्हात आणि पहाटेच्या गुलाबी थंडीत आंब्याच्या झाडांना आलेला हा अभूतपूर्व बहर म्हणजे आगामी गोडव्याची नांदी मानली जात आहे. पालोद शिवारात फेरफटका मारला असता, प्रत्येक शेतात डवरलेली झाडे आणि त्यावर लदबदलेला मोहोर



डोळ्यांचे पारणे फेडत आहे. विशेष म्हणजे, यंदा कोणत्याही कृत्रिम उपचारांशिवाय केवळ निसर्गाच्या अनुकूलतेमुळे हा बहर आल्याने, आंब्याचा अस्सल नैसर्गिक गोडवा यंदा जिभेवर रेंगाळणार, अशी चिन्हे दिसत आहेत.

गेल्या काही वर्षांत लहरी हवामानाचा फटका फळझाडांना बसत होता. मात्र, यंदा हवामानातील सातत्य आणि योग्य वेळी पडलेल्या थंडीमुळे पालोदच्या शिवारात हे उत्साहवर्धक चित्र निर्माण झाले आहे. झाडांच्या फांद्या मोहोराच्या वजनाने अक्षरशः जमिनीकडे झुकल्या असून, हा नजारा पाहण्यासाठी येणाऱ्या-जाणाऱ्या वाटसरूंचे पाऊलही आपसूकच थबकत आहे.

आगामी काळात जर निसर्गाने अशीच साथ दिली आणि अवकाळी पावसाचे सावट दूर राहिले, तर यंदा पालोदचा आंबा बाजारपेठेत आपले वेगळे स्थान निर्माण करेल. शिवारातील हा 'आम्रसोहळा' सध्या ग्रामीण भागातील समृद्धीचे प्रतीक बनून उभारी देत असून, बळीराजाच्या डोळ्यांतही या बहरामुळे एक वेगळीच चमक पाहायला मिळत आहे.

**"गेल्या अनेक वर्षांनंतर पालोद शिवारात आंब्याला असा भरघोस मोहोर पाहायला मिळाला आहे. निसर्गाचे हे वरदान पाहून ऊर भरून येतोय. जर पुढच्या काही दिवसांत हवामानाने दगा दिला नाही, तर यंदाचा हंगाम ऐतिहासिक ठरेल आणि खवय्यांना अस्सल गावरान चवीची मेजवानी मिळेल."**

**— सागर गोरे (प्रगतशील शेतकरी, पालोद)**

# १५ दिवसांत २ लाखांचा विमा दावा मंजूर!; महाराष्ट्र ग्रामीण बँक, घाटंजी शाखेचा तत्परतेचा आदर्श

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी :-** महाराष्ट्र ग्रामीण बँक, घाटंजी शाखेकडून प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजनेअंतर्गत पुष्पा विनोद मार्कंड (रा. किन्ही) यांना २ लाख रुपयांची विमा दावा रक्कम वितरित करण्यात आली. त्यांचे पती विनोद मार्कंड यांचे कॅन्सरमुळे निधन झाले होते. या योजनेअंतर्गत त्यांच्या खात्यातून दरवर्षी ४३६ रुपये प्रीमियम स्वयंचलित (ऑटो-डेबिट) पद्धतीने कपात होत असल्याने कुटुंबाला विमा लाभ सहज मिळाला. विशेष म्हणजे, बँकेने केवळ १५ दिवसांत दावा मंजूर



करून रक्कम सुपूर्द केली. चेक वितरण प्रसंगी शाखा व्यवस्थापक अपेक्षित चांदेकर, सहाय्यक व्यवस्थापक वैभव देशमुख, बँक सहाय्यक सुभाष वैद्य, वरिष्ठ लिपिक कु. प्रणोती बन व कनिष्ठ लिपिक साहिल सोनटक्के उपस्थित होते.

प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजना ही १८ ते ५० वयोगटातील बचत खातेदारांसाठी असलेली एक वर्षाची टर्म लाइफ इन्शुरन्स योजना असून, कोणत्याही कारणाने निधन झाल्यास २ लाख रुपयांचा लाभ मिळतो. वार्षिक प्रीमियम केवळ ४३६ रुपये आहे. या मदतीबद्दल श्रीमती पुष्पा मार्कंड यांनी बँकेचे आभार मानले असून, ग्रामीण नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# स्मार्ट मीटर बसविण्यात महाराष्ट्राचा देशात प्रथम क्रमांक

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग :** ग्राहकांना अचूक बिलासोबत विविध सुविधा उपलब्ध करून देणारे 87.57 लाख अत्याधुनिक स्मार्ट मीटर बसवून महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळविला असून राज्याच्या या यशात महावितरणची 85.85 लाख स्मार्ट मीटरसह प्रमुख कामगिरी आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यात ऊर्जा परिवर्तन चालू आहे. सौर कृषी पंप बसविण्यासह विविध बाबतीत महाराष्ट्राने देशात ऊर्जा क्षेत्रात प्रथम क्रमांक मिळविला आहे. आता स्मार्ट मीटर बसविण्यातही महाराष्ट्र राज्य पहिल्या क्रमांकावर आले आहे.

शंभर टक्के अचूक बिल, ग्राहकांना दर तासाला मोबाईलवर विजेचा वापर समजण्याची सुविधा, सवलतीच्या वीजदराच्या काळात अधिक वीजवापराची उपकरणे वापरण्याचे नियोजन करणे व विजेचा वापर नियंत्रणात ठेवण्याची संधी असे अनेक लाभ असलेले स्मार्ट मीटर महावितरणकडून मोफत बसविण्यात येत आहेत. स्मार्ट मीटर बसविलेल्या घरगुती वीज ग्राहकांना दिवसाच्या वीज वापराबद्दल प्रती युनिट 80 पैसे टीओडी सवलतही देण्यात येत आहे. त्याच प्रमाणे औद्योगिक आणि वाणिज्यिक वीज ग्राहकांनाही सकाळी 9 ते सायंकाळी 5 या कालावधीतील वीज वापरासाठी वीजदरात सवलत देण्यात येत आहे. राज्यात 9 फेब्रुवारी ते 23 फेब्रुवारी या कालावधीत स्मार्ट मीटर जनजागृती पंधरवडा साजरा करण्यात येत आहे.

स्मार्ट मीटर बसविण्याच्या बाबतीत दि. 10 फेब्रुवारीपर्यंतच्या ताज्या आकडेवारीनुसार 87.57 लाख स्मार्ट मीटरसह महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर असून बिहार (86.44 लाख) व उत्तर प्रदेश (82.75 लाख) ही राज्ये अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या स्थानावर आहेत.

विजेचा वापर कोणत्या वेळेला झाला त्यानुसार वीजदरात सवलत देण्याला टाईम ऑफ डे (टीओडी) सवलत म्हणतात. स्मार्ट मीटरमध्ये अशा प्रकारे वेळेनुसार वीजवापर मोजण्याची सुविधा आहे व ग्राहकांनाही त्यांच्या मोबाईल फोनमधील ॲपमध्ये दर तासाला आपल्या घरात अथवा कार्यालयात किती वीज वापर होत आहे, हे समजते. स्मार्ट मीटरमुळे घरगुती ग्राहकांनाही टीओडी सवलत सुरू केली आहे. राज्यातील 54 लाख 42 हजार घरगुती ग्राहकांना जुलै 2025 ते जानेवारी 2026 या सात महिन्यांच्या मासिक वीजबिलामध्ये तब्बल 51 कोटी 42 लाख रुपयांचा लाभ झाला आहे. याखेरीज या कालावधीत लघुदाब वर्गवारीतील औद्योगिक ग्राहकांना 106 कोटी 89 लाख रुपये, वाणिज्यिक ग्राहकांना 43 कोटी रुपये, सार्वजनिक पाणीपुरवठ्यासाठी 7 कोटी 30 लाख रुपये तर अन्य ग्राहकांना 6 कोटी 70 लाख रुपये टीओडी सवलत लाभ झाला आहे. याची एकूण रक्कम 215 कोटी 35लाख रुपये होते. उच्चदाब ग्राहकांना या कालावधीत दिवसाच्या वीजवापराबद्दल 1349 कोटी रुपयांचा टीओडी लाभ मिळाला असून त्यामध्ये औद्योगिक ग्राहकांचा वाटा 1105 कोटी रुपये आहे.

स्मार्ट मीटर बसविलेल्या ग्राहकांनी मोबाईल फोनमध्ये ॲप डाऊनलोड करून त्यामध्ये आपला वीजवापर नियमित तपासावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

स्मार्ट मीटरच्या बाबतीत स्वयंचलित पद्धतीने वीजवापराचे रिडींग नोंदविले जाते. त्यामुळे ग्राहकाला वीजवापराचे अचूक बिल मिळते. राज्यात स्मार्ट मीटरचा वापर वाढत आहे व त्याचबरोबर बिलिंगच्या तक्रारी कमी होत आहेत. राज्यात बिलिंगच्या तक्रारीचे प्रमाण अर्धा टक्क्यावर आले आहे. त्यामुळे स्मार्ट मीटरमुळे वीजबिल वाढते या तक्रारीत तथ्य नसल्याचे स्पष्ट होते.

स्मार्ट मीटरमुळे वीजदरात वाढ होईल, असाही एक गैरसमज निर्माण झाला होता. तथापि, राज्यात स्मार्ट मीटर बसविण्यास सुरुवात केल्यानंतर महावितरणने पंचवार्षिक वीजदर निश्चितीसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे दाखल केलेल्या याचिकेत वीजदर कमी करण्यासाठी परवानगी मागितली आहे. त्यामुळे ग्राहकांना स्मार्ट मीटर मोफत मिळण्यासोबतच त्याचा अप्रत्यक्ष बोजाही पडणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्यात सर्व विद्युत फीडरवर स्मार्ट मीटर बसविण्यात आले असून त्यांची संख्या 30,164 आहे तर राज्यात 2.80 लाख डिस्ट्रिब्युशन ट्रान्सफॉर्मर्सवर स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. त्यामुळे वीज वितरण प्रणालीतील विजेचा नेमका वापर समजण्यास मदत होत आहे. याच्या आधारे वीज वितरण प्रणालीचे प्रभावी व्यवस्थापन करणे, वीजगळती रोखणे आणि प्रभावी एनर्जी ऑडिटसाठी मदत होणार आहे. विजेच्या मागणीचा पॅटर्न अचूक ओळखून त्यानुसार पुरवठ्याचे नियोजन करण्यासाठी ही आकडेवारी अत्यंत उपयुक्त आहे. आगामी काळात ग्राहकांना ज्या सवलती मिळतील त्या स्मार्ट मीटरमध्ये वेळेच्या आधारे झालेल्या वीजवापराच्या अचूक नोंदीच्या आधारावर असतील. त्यामुळे ग्राहकांकडे स्मार्ट मीटर असणे गरजेचे आहे.

**स्मार्ट मीटरचे लाभ –**

- शंभर टक्के अचूक बिल
- ग्राहकाला दर तासाला मोबाईलवर वीजवापर समजतो
- दिवसाच्या वीजवापरसाठी वीजदरात टीओडी सवलत
- ग्राहकाला वीज वापरावर नियंत्रण ठेवणे आणि वापराचे नियोजन करण्याची सुविधा

उपमुख्य जनसंपर्क अधिकारी,
महावितरण, नागपूर

## माहिती अधिकार समिती करणार अपूर्ण पालखी महामार्गाच्या कामाबद्दल रास्तारोको

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील सणसर गावात संत तुकाराम महाराज पालखी महामार्गचे काम पूर्णपणे बंद ठेऊन सणसर ग्रामस्थांना वेठीस धरत नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उपस्थित केला असल्यामुळे पालखी महामार्गाचे काम बंद पडल्यामुळे इंदापूर तालुका माहिती अधिकार समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या महामार्गाचे काम ठप्प झाल्याने स्थानिक नागरिकांना वाहतुकीसाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून,शेतकरी व व्यापाऱ्यांचेही मोठे नुकसान होत आहे.

माहिती अधिकार समितीचे तालुका अध्यक्ष विकास क्षत्रिय यांनी सांगितले की नॅशनल हायवेच्या प्रशासनाने तातडीने आवश्यक असणारी कामे सुरू केले नाही तर माहिती अधिकार समितीमार्फत लवकरच रास्तारोको आंदोलन करण्यात येणार असून.या आंदोलनात मोठ्या संख्येने नागरिक महिला सहभागी होणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. स्थानिक जनतेत या निर्णयामुळे उत्सुकता निर्माण झाली असून, नॅशनल हायवे प्रशासन लोकांच्या आरोग्याशी खेळत असल्यामुळे आंदोलन करण्याची वेळ ग्रामस्थांवर आणली तर त्याची फार मोठी किंमत नॅशनल हायवे व ठेकेदार यांना मोजावी लागणार आहे.पालखी महामार्गाचे काम लवकर सुरू व्हावे,हीच माहिती अधिकार समितीची मागणी असून याबाबत आंदोलन करण्यासाठी माहिती अधिकार समितीचे कार्यकर्ते फार मोठया प्रमाणात सहभागी होणार आहेत.

## रायगड जिल्ह्यात भाजप-राष्ट्रवादीची निवडणूक पूर्व युती ; शिवसेनेला सत्तेबाहेर ठेवण्याची धडक; जिल्हा परिषदेत सत्ताजाळ रंगतदार!

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/ अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** रायगड जिल्हा परिषदेतील सत्तास्थापनेच्या रिंगणात भारतीय जनता पक्ष (भाजप) आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांची निवडणूक पूर्व युती आता ठोस रूप घेत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. एकूण ५९ जागांच्या या निवडणुकीत भाजप, राष्ट्रवादी आणि मित्रपक्षांकडे मिळून ३५ जागांचे स्पष्ट बहुमत आहे. यामुळे शिवसेनेला (ठाकरे गट) सत्तेबाहेर ठेवण्याची दाट शक्यता व्यक्त होत असून, जिल्हाभरातील चहा-टपरी आणि राजकीय मेळाव्यांतून ही चर्चा जोर धरत आहे. "शिवसेना आता बाजूला पडेल, भाजप-राष्ट्रवादीची जोडी धुमाकूळ घालेल!" अशा प्रतिक्रिया रायगडच्या गल्लोगल्लीत घुमू लागल्या आहेत. संख्याबलाची मजबुती आणि युतीचे संकेत जिल्हा परिषदेच्या निकालानुसार भाजपकडे १५, राष्ट्रवादीकडे १६ तर ठाकरे गटाच्या शिवसेनेकडे ४ जागा



आहेत. कर्जत-खालापूर भागातील राष्ट्रवादी-ठाकरे शिवसेना युतीमुळे हे संख्याबळ आणखी बळकट झाले आहे. राष्ट्रवादीचे नेते सुनील तटकरे यांनी भाजपसोबत युतीचे स्पष्ट संकेत देताच, भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष आणि खासदार धैर्यशील पाटील यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला. "भाजप आणि राष्ट्रवादी एकमेकांसोबत कटिबद्ध आहेत. शिवसेनेचा सहभाग वरिष्ठ पातळीवरील निर्णयावर अवलंबून राहील," असे पाटील म्हणाले. या युतीमुळे सत्ता स्थापनेसाठीची जुळवाजुळव वेगाने पुढे सरकत असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

**"नेत्यांच्या हालचाली आणि मुख्यमंत्री भेट "**

या घडामोडींमध्ये मंत्री भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी आणि आमदार महेंद्र थोरवे यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेतली. सत्तास्थापनेच्या सूत्रांनी सांगितले, की या बैठकीत जिल्हा परिषदेतील गणित आणि पद वाटपाबाबत सविस्तर चर्चा झाली. मात्र, अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. " मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची छाप आहे, युती पक्की होईल," असे राजकीय निरीक्षक सांगतात. या पार्श्वभूमीवर रायगडच्या राजकारणात नवी रंगत आली असून, राष्ट्रवादी-भाजपची ही जोडी जिल्ह्याच्या विकासाच्या दिशेने नवे पाऊल टाकेल की नाही, याची उत्सुकता आहे.

**"नागरिकांमध्ये रंगतदार चर्चा "**

'रायगड जिल्ह्यातील अलिबाग, रेवदंडा, पनवेलपर्यंतच्या बाजारपेठा, चहा टपऱ्या आणि सोशल मीडियावर ही बातमी चांगलीच हादरली आहे. "राष्ट्रवादी-भाजपची युती असताना , महायुतीतील मित्रपक्ष शिवसेनेच काय सत्तेत येणार की विरोधात ? आता विकासाला गती मिळेल," असे अलिबागच्या एका शेतकऱ्याने सांगितले. तर रेवदंड्यातील व्यापाऱ्यांनी , "कर्जत-खालापूरची युतीचं गुपित काय? सत्ता कोणाची?" असा प्रश्न उपस्थित केला. जिल्हाभरातील नागरिक आणि राजकीय कार्यकर्त्यांच्या तोंडून "सत्तेची जादूगार जोडी" हीच चर्चा आहे. अलीबागच्या समुद्रकिनारी फिरणाऱ्या तरुणांपासून रायगड किल्ल्याजवळच्या पर्यटकांपर्यंत ही बातमी पोहोचली असून, "अखेर सत्ता स्थापनेची तारीख कधी?" ही उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.या राजकीय घडामोडींमुळे रायगड जिल्हा परिषदेत अंतिम जुळवाजुळव काय होणार, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. अधिकृत घोषणे झाल्यावरच खरे चित्र स्पष्ट होईल.

## रेशीमबाग मध्ये झाले विराट हिंदू संमेलन

### कितीही आक्रमण झाले तरी सनातन धर्म संपणार नाही..... अमर कुलकर्णी यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादक :** हजारो वर्षांची मुगलांची सत्ता आणि दोनशे वर्षांची इंग्रजांचे राज्य सुद्धा हिंदू सनातन धर्म संपवू शकpले नाहीत, त्यामुळे आता अनुकूल परिस्थितीत कितीही आक्रमण झाले तरी सनातन हिंदू धर्म संपणार नाही असे प्रतिपादन रेशीमबाग येथे झालेल्या विराट हिंदू संमेलनात सुप्रसिद्ध वक्ता अमर कुलकर्णी यांनी केले. याप्रसंगी त्यांनी नवीन पिढीला दोष देण्यापेक्षा त्यांना पडणाऱ्या प्रश्नांना समाधानकारक उत्तर देण्यासाठी तयार रहा, नवीन पिढीचा सनातन हिंदू धर्मावर विश्वास आहे फक्त त्यांची व्यक्त करण्याची पद्धत वेगळी आहे हे समजून घेण्याची गरज आहे, असे मत अमर कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

दि. 14:02:2026 रोजी श्री संत तुकाराम उद्यान, रेशीमबाग येथे दिवसभर चाललेल्या हिंदू संमेलनात दुपारी श्री




गणेश यागाचे आयोजन करण्यात आले होते. यजमानत्व श्री. अनंतराव बैतुले दांपत्याने व पौरोहित्य श्री. माधवराव शिरास गुरुजी न चमूने केले. याप्रसंगी बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते.

सायंकाळी मुख्य कार्यक्रमाची सुरुवात सौ. प्राची मुळे यांनी मातृभूमी स्तवन वंदे मातरम ने केली. सकल हिंदु समाजाचे सम्मेलन असल्याने विविध समाजाचे प्रतिनिधित्व म्हणून ह. भ. प. मकरंदबुआ देवरस, सकल हिंदु समाज, डॉ. गुरुपालसिंह, डीन, रायसोनी इन्स्टिट्यूट .. सिख समाज , प्राचार्य डॉ सुरेश भुसारी, जैन समाज, सुप्रसिध्द स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्रगती खळतकर, मातृशक्ती व डॉ. महानंद मेत्तानंद महाथेरो यांनी मार्गदर्शन करुन संमेलनाच्या यशस्वीते साठी आशिर्वाद दिले. डॉ. महानंद मेत्तानंद महाथेरो बौद्ध समाज यांचेही आशिर्वाद प्राप्त झाले. श्री अरुण जोशी, यांची स्वातंत्रवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई च्या अध्यक्षपदि सलग 13 व्यादा निवड झाली म्हणून सत्कार करण्यात आला. नवनिर्वाचित नगरसेवक सौ. मंगलाताई म्हस्के, सौ. मानसी सिमले, श्री गणेश चर्लेवार, यांचा सत्कार करण्यात आला. रेशीमबागेतील विविध संस्थांचे प्रतिनिधि म्हणून सर्वश्री. अशोक बुजोणे मा. संघचालक नंदनवन भाग, रा.स्व. संघ,किशोर धाराशिवकर अध्यक्ष, केशवनगर सांस्कृतिक सभा, अमर आकरे, अध्यक्ष कलासंगम, सुप्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. वसंत खळतकर, डॉ. इटकेलवार, डॉक्टर मिलिंद हरदास, अध्यक्ष सक्षम, ऍड रमण सेनाड लोक जागृती मोर्चा, आणि अनेक मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

यानंतर दिव्यांग कलाकारांचा भक्तीगीताचा कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमाला नागपूरच्या नवनिर्वाचित महापौर सौ. नीता ठाकरे आणि उपमहापौर सौ. लीला हाथीबेड उपस्थित होत्या. महापौर सौ. नीता ठाकरे यांनीसुद्धा मुझे अपनी शरण मे लेलो राम हे भक्तीगीत सादर केले. कार्यक्रमाला रेशीमबागेतील नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता महाप्रसादानी झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रेशीमबागेतील विविध सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, क्रीडा आणि सामाजिक संस्थाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाची संकल्पना, संयोजन श्री सुधीर सांगोळे आणि संदीप वाघ यांचे होते तर श्री. श्रीकांत ईरुटकर, प्रवीण घुले, आनंद पांढरे, मारोडकर, रमेश महाजन, अतुल तिजारे. यांनी परिश्रम केले.

## जिजाऊ पुरस्कार व वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**केज प्रतिनिधी- शरद गिराम :** धाराशिव तालुक्यातील तेर येथील प्रेरणा सामाजिक संस्था संचलित लिटल फ्लॉवर्स स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन व जिजाऊ पुरस्कार वितरण सोहळा अत्यंत उत्साहात व आनंदी वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमास पालक, ग्रामस्थ व शिक्षणप्रेमी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व जिजाऊंच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. त्यानंतर शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध गाण्यांवर नृत्याविष्कार, देशभक्तीपर गीत, नाटिका आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत आपल्या कलागुणांची चमकदार झलक दाखवली. टाळ्यांच्या कडकडाटात प्रत्येक सादरीकरणाला भरभरून दाद मिळाली.

या वेळी समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा 'जिजाऊ पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. अर्चना रवींद्र अंबुरे, संध्या शिंदे, अनिता घोडके, उज्वला




शिंदे आणि सविता कन्हेरे यांना मानपत्र, जिजाऊंची प्रतिमा, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या कार्याचा गौरव करताना मान्यवरांनी स्त्रीशक्तीच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले.कार्यक्रमात शाळेच्या प्रगतीविषयी माहिती देताना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. पालकांनीही विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक करत शाळेच्या उपक्रमांचे स्वागत केले.समारोप प्रसंगी सर्व मान्यवरांचे आभार संस्थेचे संचालक तानाजी पिंपळे यांनी मानले. आनंद, उत्साह आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडलेला हा सोहळा विद्यार्थ्यांसाठी व पालकांसाठी अविस्मरणीय ठरला.या साठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## जुन्या भांडणाच्या रागातून पिता पुत्रावर जीवघेणा हल्ला

**दैनिक युवक आधार**


**पनवेल दि.१७(वार्ताहर) :** पनवेल मधील विंधणे परिसरातील कोनार्क हेवन सोसायटीमध्ये जुन्या भांडणाचा राग मनात धरून दोन तरुणांनी येथील सुनील श्रीपती मोहिते (५१) व समीर सुनील मोहिते (२३) या पिता-पुत्रावर चाकूने जीवघेणा हल्ला केल्याची खळबळजनक घटना घडली. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार नोंद करण्यात आल्यावर पोलिसांनी शाकीर शब्बीर खान (२४) आणि सिद्धांत प्रवीण मोरे (२३) या दोघांना अटक करण्यात आली.मोहिते पिता-पुत्र, शाकीर खान आणि सिद्धांत मोरे हे सर्व कोनार्क हेवन सोसायटीमध्ये राहतात. पनवेलमधील विंधणे परिसरातील गेल्या वर्षी दिवाळीदरम्यान दारू पिण्याच्या क्षुल्लक कारणावरून शाकीर खान, सिद्धांत मोरे व समीर मोहिते यांच्यात वाद होऊन भांडण झाले होते. या भांडणाचा राग मनात धरून शाकीर व सिद्धांत यांनी गेल्या शनिवारी मध्यरात्री समीरला शिवीगाळ केल्याने त्यांच्यात भांडण सुरू झाले.यावेळी सिद्धांत याने समीर याला पकडून ठेवले, तर शाकीर याने समीरवर चाकूने वारे केले. सोबतच समीरच्या वडीलांवरही चाकूचे वार करून त्पंनरा जखमी केले. या घटनेनंतर या दोघांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आल्यावर पनवेल तालुका पोलिसांनी शाकीर खान आणि सिद्धांत मोरे या दोघांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली आहे. तर, दुसरीकडे सिद्धांत शाकीर यांनी समीर व त्याचे वडील सुनील व विजय गायकवाड या तिघांनी मारहाण केल्याची तक्रार दाखल केली आहे.

## ग्रामविकासाची यशोगाथा : जोरण–जोरणपाडा ग्रामपंचायतीच्या संचालक मंडळाचा गौरवपूर्ण निरोप सोहळा

**दैनिक युवक आधार**

**कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत) :** ग्रुप ग्रामपंचायत जोरण–जोरणपाडा येथे दि. 14 फेब्रुवारी 2021 रोजी संचालक मंडळाची बिनविरोध निवड झाली होती. निवडीनंतर नव्याने रुजू झालेले ग्रामविकास अधिकारी संदीप चारुडे यांनी मंडळाला योग्य मार्गदर्शन करत विकासकामांना गती दिली. त्यांच्या नेतृत्वाखाली मंडळाने योजनाबद्ध पद्धतीने काम करत गावाच्या सर्वांगीण प्रगतीचा भक्कम पाया घातला.

या कालावधीत गावातील अनेक



महत्त्वपूर्ण विकासकामे यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली. पाणी प्रश्न सोडविणे, घरकुल योजना राबविणे, माती तलाव निर्मिती, पानंधन रस्त्यांची दुरुस्ती, जोरणपाडा स्मशानभूमीचे नूतनीकरण, शौचालय बांधकाम, महिलांसाठी धोबी घाट उभारणी तसेच नवीन अंगणवाडी इमारतीचे बांधकाम अशा विविध उपक्रमांमुळे गावाच्या विकासाला नवी दिशा मिळाली.

दि. 14 फेब्रुवारी 2026 रोजी संचालक मंडळाचा कार्यकाळ संपल्यानंतर ग्रामपंचायत कार्यालयात निरोप व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. ग्रामविकास अधिकारी संदीप चारुडे यांनी सर्व संचालक मंडळ सदस्यांचा फुलांचे गुच्छ व मिठाई देऊन सन्मान केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याण कुडके यांनी प्रभावी शैलीत केले. यावेळी उपस्थित सदस्यांनी आपापले मनोगत व्यक्त करून विकासकामांच्या आठवणींना उजाळा दिला.या प्रसंगी सरपंच मंगेश लोखंडे, उपसरपंच गोविंद गायकवाड, ज्ञानेश्वर भुसारे, अशोक गायकवाड, सुरेखा चारोस्कर, रेणुका गायकवाड, भामा गावित, मालतीबाई गांगुर्डे तसेच अन्य मान्यवर आणि ग्रामपंचायत शासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.संपूर्ण कार्यक्रम अत्यंत आनंददायी आणि उत्साही वातावरणात पार पडला. ग्रामविकासाच्या वाटचालीत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या संचालक मंडळाच्या कार्याचा गौरव करत उपस्थितांनी त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. गावाच्या प्रगतीसाठी एकत्रित प्रयत्नांची ही प्रेरणादायी नोंद ठरली.

# नवघर गावच्या कथा आणि व्यथा !! कोण मांडणार आणि कोण सोडवणार !!

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख /एम.डी.भोईर** : उरण तालुक्यातील श्रीमंत तसेच राजकीय,सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर म्हणून आम्ही समजणा-या नवघर ग्रामस्थ मंडळ,नवघरपाडा ग्रामस्थ मंडळ तसेच कुंडेगाव ग्रामस्थ मंडळ मिळून सुसज्य अशी आमची ग्रामपंचायत आणि त्या ग्रामपंचायती मध्ये आम्ही राहणारे ग्रामस्थ आणि सुज्ञ मतदार वाडवडीलांपासून नवघर गावाच्या वेशीवर एक गोड्या पाण्याचं तलाव असून श्री आसरा देवीचे स्वयंभू स्थांन या तलावात असून दर मंगळवारी आमच्या या नवघर ग्रामपंच्यायतीच्या तिन्ही




गावातील माता-भगिनी तसेच सासरवासिनि देखील माहेरी आल्यावर या आसरा देवीची खणा-नारळाने ओटी भरण्यासाठी आसरा देवीच्या या तलावावर असलेल्या मंदिरा आर्वजून जातात त्या आसरा देवीच्या तलावाची चाललेली विटंबना नवघर,नवघरपाडा आणि कुंडेगावचे ग्रामस्थ तसेच नवघर ग्रामपंचायत ठोस निर्णय घेऊन थांबवील का ?? हा येथील सामान्य नागरिकांना पडलेला मोठा प्रश्न असून या आसरा देवीच्या तलावावर राजरोसपणे गर्दुले दारूच्या पार्ट्या करतात याचं ज्वलंत उदाहरण म्हणजे या आसरा देवीच्या तलावात बियर,कॉटरच्या बाटल्यांचा खच तसेच बाहेर गावचे नागरिक आप-आपल्या गाड्या,रिक्षा,ट्रक,टेम्पो धुण्यासाठी याच तलावाचा वापर करतात तोही नवघर करांच्या नाकावर टीच्चून !! हे तिन्ही गावचे ग्रामस्थ उघड्या डोळ्यांनी पाहत असून कोणाचीही हिंमत या बेवड्या,दारुड्या गर्दुल्यांना थांबवण्यांची हिंमत होत नाही याचेच नवल वाटत आहे.

# श्रीवर्धन आगाराचा कारभार सुस्त; मुंबई मार्गावरील बससेवेचा बोजवारा, प्रवाशांचा संताप

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/ अनिकेत मोहित** : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळच्या श्रीवर्धन आगारातील नियोजनशून्य आणि ढिसाळ कारभारामुळे लांब पल्ल्याच्या प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. विशेषतः मुंबई मार्गावरील बससेवा वारंवार उशिरा सुटणे, प्रवासादरम्यान बसेस नादुरुस्त होणे आणि "एक्स्प्रेस" बसला अनावश्यक थांबे देणे या प्रकारांमुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

श्रीवर्धनहून मुंबईकडे जाणारी सकाळी ११:१५ वाजताची बस रविवारी (१५ फेब्रुवारी) तब्बल सव्वा तास उशिराने मार्गस्थ झाली. प्रवाशांनी वेळेवर आगारात हजेरी लावूनही बस वेळेत



सुटली नाही. काही प्रवाशांना मुंबईत महत्त्वाची कामे, वैद्यकीय भेटी होत्या पण बस उशिराने सुटल्याने त्यांचा संपूर्ण दिनक्रम विस्कळीत झाला.

याहूनही गंभीर बाब म्हणजे, लांब व मध्यम पल्ल्याच्या मार्गांवर खासगी तत्त्वावरील बसेस सोडल्या जात आहेत. या बसेसची अवस्था अत्यंत दयनीय असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. प्रवासादरम्यान वारंवार बिघाड होणे, एसी यंत्रणा बंद पडणे, अशा तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. सुरक्षित आणि सुरळीत प्रवासाची हमी देणाऱ्या सेवेबाबतच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मुंबई मार्गावरील बस "एक्स्प्रेस" म्हणून दर्शवली जात असली तरी नागोठणे ते खारपाडा दरम्यान प्रत्येक स्थानिक थांब्यावर बस थांबवली जात असल्याचा आरोप प्रवाशांनी केला आहे. त्यामुळे प्रवासाचा वेळ अनावश्यकपणे वाढत असून एक्स्प्रेस सेवेचा उद्देशच फोल ठरत आहे. वेळ वाचवण्यासाठी एक्स्प्रेस बसची निवड करणाऱ्या प्रवाशांचा संताप यामुळे अधिकच वाढला आहे.

श्रीवर्धनचे रहिवासी गणेश पोलेकर यांच्यासह अनेक प्रवाशांनी आगार प्रशासनाने गाड्यांची नियमित व सखोल तांत्रिक तपासणी करावी, तसेच नागोठणे–खारपाडा दरम्यानचे अनावश्यक थांबे तात्काळ रद्द करावेत, अशी मागणी केली आहे. "प्रवाशांकडून पूर्ण भाडे घेतले जाते, मात्र सेवेची गुणवत्ता मात्र ढासळलेली आहे," अशी भावना प्रवाशांनी व्यक्त केली.

श्रीवर्धन आगारातून सुटणाऱ्या खासगी बसेसची खरंच नियमित तपासणी केली जाते का? मुंबई मार्गावरील गाड्यांना अतिरिक्त थांबे देण्याचे आदेश नेमके कुणाकडून दिले जात आहेत? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे देण्याची वेळ आता आगार प्रशासनावर आली आहे.

दररोज शेकडो प्रवासी या मार्गावर अवलंबून आहेत. त्यामुळे केवळ आश्वासने न देता ठोस आणि तातडीची उपाययोजना करणे गरजेचे आहे. अन्यथा श्रीवर्धन आगाराच्या कारभारावरील विश्वास आणखी डळमळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# पाणी बिल थकीत असलेल्या बिल्डिंग मधील फ्लॅट धारकांना वैयक्तिक पाणी कनेक्शन

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी** : ठाणे महानगर पालिकेतील दिवा प्रभाग समिती अंतर्गत येणाऱ्या काही अनधिकृत बिल्डिंग चे पाणी बिल थकीत आहे. अशा बिल्डिंगमध्ये काही रूमवाल्याना वैयक्तिक पाण्याचे कनेक्शन दिल्याचे आढळून आले आहे.दैनिक युवक आधारचे पत्रकार रमेश राऊत यांनी याविषयी माहिती घेतली असता जवळपास पाच ते सहा वर्षापासून हे असे कनेक्शन देण्याचे काम दिवा प्रभाग समितीतील अधिकारी करत असल्याचे समजले आहे. पाणीपुरवठा विभागातील काही अधिकारी पैसे घेऊन हे कनेक्शन देत असल्याचे उघडकीस आले आहे शासनाच्या अभय योजनेचे पेपर देऊन हे लीगल कनेक्शन असल्याचे सांगून रूम वाल्यांची फसवणूक केली गेली आहे.ज्यावेळेस हे कनेक्शन घेतले आहे त्या वेळेचे जे कोणी अधिकारी दिवा प्रभाग समितीमध्ये कार्यरत असतील अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी दैनिक युवक आधारचे पत्रकार तसेच राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा कोषाध्यक्ष रमेश राऊत हे आयुक्तांकडे करणार आहेत. बिल थकीत असलेल्या बिल्डिंग मधील रूम वाल्यांना वैयक्तिक कनेक्शन दिल्यामुळे थकीत बिल तसेच राहून शासनाचा लाखो रुपयांचे नुकसान होत आहे.

# दुखवटा काळात झालेला अल्पसंख्यांक दर्जा घोटाळ्यामुळं महाराष्ट्राची बदनामी – खासदार सुप्रिया सुळे

**दैनिक युवक आधार**

**नवी दिल्ली / प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या पोलीस आणि प्रशासनाची एक चांगली ओळख देशात होती,दुखवटा काळात झालेला अल्पसंख्यांक दर्जा घोटाळ्यामुळं महाराष्ट्राची बदनामी होत आहे.आता त्याची अशा प्रकरणांमुळं बदनामी होत आहे. हे महाराष्ट्रासाठी चांगलं नाही. मला मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षा आहे की असे प्रकार होणार नाहीत याची काळजी घ्यावी,असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे यांनी दिल्ली येथे पत्रकारांशी संवाद साधताना म्हटले आहे.

सुप्रिया सुळे बोलताना म्हणाल्या की,माणुसकी राहिली आहे की नाही. त्या मंत्रालयात दुखवटा असताना असं झालंच कसं हे खूप गंभीर आहे, शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आला. याबाबत त्यांनी याची माहिती मला माध्यमातूनच मिळाली. मुख्यमंत्र्यांनी याबाबत स्टे दिला आहे असं मला कळालं आहे. हे प्रकरण माध्यमांनी उजेडात आणलं. त्यामुळं तुमचं अभिनंदन आहे. मी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांकडे याबाबत एक स्टेटमेंट द्यावं अन् हे झालंच कसं हे सांगावं अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी केली आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की,आमच्या घरातील संस्कार जे झाले आहेत. माझा विश्वास आणि अपेक्षा आहे की आमच्या घरातील मुलं मुलींकडून असं कोणतंही काम करणार नाहीत आणि करू देखील नये. एवढी एक आत्या, आई आणि मावशी म्हणून आमच्या घरातील सगळ्याच मुलांकडून ही अपेक्षा आहे. असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

सुप्रिया सुळे यांना पार्थ पवार जमीन घोटाळा प्रकरणी देखील प्रश्न विचारण्यात आला. यावर सुप्रियाताई सुळे म्हणाल्या की,पार्थ पवार यांचे प्रकरण न्यायालयात आहे.तपास अहवाल आणि कोर्टाचा अंतिम निर्णय येईपर्यंत त्यावर बोलणं योग्य होणार नाही, न्यायालयाचं यावर काय म्हणणं आहे त्यावर आपण कसं बोलणार. या देशात कोर्टाचा निर्णय आपल्या सर्वांना मान्य करावा लागतो. असे सुप्रिया सुळे यांनी बोलताना सांगितले.

पुढे बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की,मुख्यमंत्री हे मंत्रालयाचे प्रमुख आहेत. मंत्री हा मंत्री असतो. त्याला पक्षात विभागू नका. ACB कारवाईचे रिपोर्टिंग कुणाला करत? तर मुख्यमंत्र्यांना करतं. मंत्रालयाच्या 6 व्या मजल्यावर बसतात. त्यांच्याकडे गृहमंत्रालय आहे. या गृहमंत्रालयानेच मंत्रालयातील तिसऱ्या,चौथ्या मजल्यावरील त्यांच्याच कॅबिनेटमधील मंत्र्याकडे एसीबी जाणं हे धक्कादायक नाही का? मग ही तक्रार केली कुणी? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याचं उत्तर दिलं पाहिजे असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.


सुप्रिया सुळे म्हणाल्या की,कुणीतरी टीप ऑफ दिला ना. हा टिप ऑफ कुणी दिला. स्वतःच्याच मंत्र्याला, मंत्रालयातच कारवाई होते. म्हणजे तुम्हीच तुमच्या मंत्र्यांवर रेड करता, छापा घालता. मुख्यमंत्री ज्या वास्तूत बसतात. त्यात, त्यांच्या डोळ्यासमोर, त्याच मंत्र्यांच कार्यालय तुम्ही सील करता. हा मोठा धक्का आहे. आपल्याच घरात आपण आपल्याच माणसावर छापा घातला असा हा प्रकार आहे. टीप कुणी दिली. हे खरं आहे की खोटं आहे याची उत्तरं माझ्याकडं नाहीत,डेटा आणि वास्तव नसल्यास मी त्यावर अधिक भाष्य करणे, बोलणे योग्य नाही. पण मंत्रालयात स्वतःच्याच मंत्र्यांवर असा छापा घालणं धक्कादायक आहे. जेव्हा तुम्ही मुख्यमंत्री असता तेव्हा तुम्ही राज्याचे मुख्यमंत्री असता, पक्षाचे नसता. मंत्री हा पक्षाचा नसतो. तर तुमच्या कॅबिनेटचा असतो, असे सुप्रिया सुळे यांनी बोलताना स्पष्टपणे सांगितले आहे.

यावर सविस्तर बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की,मी झिरवळांना अनेक दिवसांपासून ओळखते. छगन भुजबळ आणि नबाब मलिक जेव्हा अडचणीत आले ,तेव्हा मी त्यांच्यासोबत होते. आम्ही एकमेकांच्या सुख-दुःखात सोबत होतो,समज दिली नाही दिली याविषयी मी सांगू शकत नाही. झिरवळांसोबत मी काम केलं आहे. ते शून्यातून वर आले आहे. त्यामुळे झिरवळांबाबत जो आरोप केला जात आहे, त्याबाबत पारदर्शकपणे चौकशी व्हावी आणि मुख्यमंत्र्यांनी त्यावर स्पष्टीकरणं द्यायला हवं अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली आहे.

# सोयगाव सज्ज शिवजयंतीच्या जल्लोषासाठी; अध्यक्षपदी बंटी काळे,उपाध्यक्षपदी शेख रौफ यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे** : शिवभक्तांच्या उत्साहात आणि जल्लोषात सोयगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.यंदाही उत्सव भव्य,दिव्य आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला. सलग पाचव्यांदा यावेळी अध्यक्षपदी कर्तव्यदक्ष नगरसेवक बंटी भाऊ काळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली,तर उपाध्यक्षपदी नगरसेवक शेख रौफ (शेख कालू) यांची निवड झाली.कार्याध्यक्षपदी विजय काळे,कोषाध्यक्षपदी कदीर शहा आणि सचिवपदी संदीप चौधरी यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली.



बैठकीस ज्येष्ठ सदस्य रवी काळे,योगेश पाटील,राजू दुतोंडे,पवन परदेशी, अतुल चौधरी,कृष्णा जूनगरे,प्रमोद पाटील,पूनम परदेशी,सुनील काळे,अंकुश पगारे,तेजस काळे,स्वप्नील चौधरी,कार्तिक चौधरी, ऋतिक चौधरी,देवेंद्र चौधरी,भाऊसाहेब काळे,आदित्य काळे,अतुल चौधरी,बंटी चौधरी,दीपक परदेशी,गणेश साळुंखे,गोपाल गांगुर्डे,हर्षल गावंडे,जयेश गाडेकर,शुभम गाडेकर,कल्पेश बागुल,कुणाल पाटील,मनोज मनगटे, निखिल पाटील,राजेश काळे, रितेश काळे,साहिल पाटील, साई परदेशी,आयुष चौधरी, श्रीराम काळे,सोनू काळे, शोबराज चौधरी,सोनू पाटील, कमलेश काळे,प्रसाद काळे, मोहित पाटील,ओम काळे, यश काळे,ऋषी काळे आदींसह मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते. नगरसेवक बंटी भाऊ काळे सलग पाच वर्षांपासून अध्यक्षपदाची धुरा समर्थपणे सांभाळत असून त्यांच्या नेतृत्वाखाली शिवजयंती उत्सवाला नवे वैभव लाभले आहे.विशेष म्हणजे उपाध्यक्षपदी नगरसेवक शेख रौफ यांची निवड होत हिंदू-मुस्लिम ऐक्याचा सुंदर संदेश देण्यात आला. शिवजयंती उत्सव समिती ही सामाजिक सलोखा आणि एकतेचे प्रतीक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.दि.१८ फेब्रुवारी २०२६ रोजी जय वैष्णवी माता मित्र मंडळ व रिपब्लिकन सेनेकडून शिवभक्तांसाठी भोजन,नाश्ता व चहापाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.ही व्यवस्था डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर करण्यात येणार असून सर्व शिवभक्तांनी याची नोंद घ्यावी,असे आवाहन आयोजकांनी केले आहे. यंदाची शिवजयंती केवळ उत्सव नसून स्वराज्याच्या विचारांची मशाल पेटवणारा प्रेरणादायी सोहळा ठरणार असल्याचा विश्वास कार्यकारिणीने व्यक्त केला. शहरात भगव्या पताका, आकर्षक रोषणाई,सामाजिक उपक्रम आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून शिवजयंती जल्लोषात साजरी करण्यात येणार आहे.

# सौ.माधुरी सागर भिसे यांना जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती पद मिळणार?

**दैनिक युवक आधार**

**सणसर:- विकास क्षत्रिय** : नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत इंदापूर तालुक्यातील सणसर लासुर्णे जिल्हा परिषद गटातील उमेदवार म्हणून जिल्ह्यातील झालेल्या मतदानावरून मिळालेल्या मतांच्या टक्केवारीत सर्वाधिक मते सौ माधुरी सागर भिसे यांना मिळालेली दिसत आहेत.आता जिल्हा परिषदेतील अध्यक्ष पदाची निवडणुक झाल्यानंतर इंदापूर पंचायत समिती सभापती पद सुद्धा अनुसूचितसाठी राखीव आहे.सध्या पुणे जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती पदासाठी सौ.माधुरी सागर



भिसे यांचे नाव चर्चेत आहे. तालुक्यातील विविध ठिकाणी त्यांच्या कार्याची दखल घेतली जात असून,समाजकल्याण क्षेत्रातील त्यांच्या सक्रियतेमुळे त्यांना हे पद मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भिसे यांची सभापतीपदी निवड केली तर इंदापूर तालुक्याचे आमदार व राज्याचे कृषीमंत्री यांचीच सणसर लासुर्णे गटात नक्कीच ताकत वाढणार असल्याची चर्चा स्थानिक राजकीय वर्तुळात जोर धरू लागली असून,सौ माधुरी भिसे यांचे नाव पुढे येणे ही तालुक्यातील महिलांच्या नेतृत्वाला मिळालेली मोठी संधी मानली जात आहे.अंतिम निर्णय अद्याप अधिकृतरीत्या जाहीर झालेला नसला तरी त्यांच्या नावाभोवती वरिष्ठ नेत्यांकडे मागणी करून पद देण्यासाठी कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा निर्माण झाली आहे.

# बनावट नोटा प्रकरणी एकाला अटक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल दि.१७(वार्ताहर):** उलवे पोलीस ठाण्याच्या हद्दीत असणाऱ्या बामणडोंगरी गावात बनावट नोटाप्रकरणी एका संशयित आरोपीला अटक करण्यात आली आहे. त्याच्या कडून ३० हजार ५०० रुपयांच्या नोटा जप्त करण्यात आल्या आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आसारउल्ला हक नाझिर शेख असे आरोपीचे नाव असून तो ज्यूस विक्रीचा व्यवसाय करतो. त्याच्याकडून एकूण ५०० रुपयाच्या ३०,५०० रुपये किमतीच्या ६१ बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. या बनावट नोटा व्यवहारात वापरण्याच्या उद्देशाने आरोपीने स्वतःच्या ताब्यात बाळगल्या होत्या, अशी माहिती पोलीस तपासात उघड झाली आहे. याप्रकरणी आरोपीविरुद्ध उलवे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चांगू काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज , न्यू पनवेल ( अधिकारप्रदात्त स्वायत्त ) येथे पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी शिमाडझूच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** रसायनशास्त्र विभागामार्फत शिमाडझूच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त एम.एस्सी. भाग–१ व भाग–२, (विश्लेषणात्मक रसायनशास्त्र, सेंद्रिय रसायनशास्त्र व जैवतंत्रज्ञान) तसेच पीएच. डी. संशोधक विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना आधुनिक विश्लेषणात्मक उपकरणांची तत्त्वे, कार्यपद्धती, कॅलिब्रेशन, ऑपरेशन, सुरक्षित हाताळणी तसेच गुणवत्ता मानके यांची माहिती देणे हा होता.





या कार्यक्रमासाठी शिमाडझू इंडिया प्रायव्हेट लिमिटेड,अंधेरी-एलसी/एलसीएमएस केंद्राचे तज्ञ सहाय्यक व्यवस्थापक डॉ. अमोल शिंदे आणि जीसी/जीसीएमएस फार्मा मार्केट तज्ञ श्री. हेमंत केसरकर हे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना विविध अत्याधुनिक उपकरणांबाबत सविस्तर माहिती दिली आणि प्रात्यक्षिक दाखवले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. (डॉ.) एस. के. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमीकक्ष समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, विज्ञान शाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. डी. के. पाटील यांनी केले.प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना ॲटोमिक ॲब्सॉर्प्शन स्पेक्ट्रोस्कोपी (ए.ए.एस) सह विविध विश्लेषणात्मक उपकरणांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एम.एस्सी. भाग–१ व भाग–२ रसायनशास्त्र आणि जैवतंत्रज्ञान शाखेतील एकूण ९४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. (डॉ.) बी. व्ही. जाधव, जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख प्रा. (डॉ.) सीमा एस. कोकितकर तसेच रसायनशास्त्र व जैवतंत्रज्ञान विभागातील सर्व प्राध्यापकांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले.

हा प्रशिक्षण कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त व ज्ञानवर्धक ठरला.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाडळी येथे शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी राम शामराव ठोके यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**

**परतूर - जालना(अशोक ठोके)** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाडळी येथे शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी राम शामराव ठोके तर उपाध्यक्षपदी ज्ञानोबा बोराडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे त्यावेळी उपस्थीत अशोक बोराडे, पांडुरंग बोराडे, संतोष डंबाळे, माणिक चव्हाण, पांडुरंग लिंबुरे, रामनाथ लिंबूरे, सोनाजी कासार, रफीक मोमिन , (पालक सदस्य) तसेच विष्णू बोराडे ( शिक्षण प्रेमी) सारुलाल काळे, प्रकाश कासार,प्रसाद काकडे लोकप्रतिनिधी(सरपंच), शामराव काळे लोकप्रतिनिधी (उपसरपंच), अमोल राठोडे सर



(मुख्याध्यापक), वर्षा बालापुरे (सहशिक्षिका), जीलबाबाई काळे अंगणवाडी सेविका, जेबुनिसा मोमिन आदी उपस्थीत होते.

## ३६०० कि.मी. पायी नर्मदा परिक्रमा पूर्ण – १९ फेब्रुवारीला अंभोरा येथे भव्य स्वागत सोहळा



**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे** : अंभोरा (ता. …) — श्रद्धा, संयम व भक्तिभावाचे प्रतीक असलेली ३६०० किलोमीटरची पायी नर्मदा परिक्रमा यशस्वीरित्या पूर्ण करून गावात परतणाऱ्या भाविकांच्या स्वागतासाठी गुरुवार दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजता अंभोरा येथे भव्य स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

परिक्रमेत सहभागी झालेले :श्री. अर्जुन विठोबा आमले | श्री. अंकुश हरिभाऊ ओहाळ | श्री. नामदेव धोंडीभाऊ आमले | श्री. उत्कर्ष अंगद पडोळे| श्री. नामदेव सयाजी खाकाळ | श्री. बबन आश्रुबा खाकाळया भाविकांनी नर्मदा मातेच्या चरणी नतमस्तक होत ऊन-वारा-पावसाची पर्वा न करता अत्यंत कठीण परिस्थितीत ही दीर्घ पायी यात्रा पूर्ण केली आहे. नर्मदा परिक्रमा ही केवळ धार्मिक यात्रा नसून आत्मशुद्धी, संयम आणि अध्यात्मिक साधनेचा मार्ग मानली जाते. स्वागत सोहळ्यानिमित्त गावातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून फुलहार, औक्षण, आरती व जयघोषाच्या माध्यमातून परिक्रमार्थींचा सत्कार करण्यात येणार आहे. ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.या स्वागत समारंभानिमित्त सकाळी १० ते १२ या वेळेत भागवत धर्मप्रचारक ह.भ.प. संजय महाराज घोडके (चिचोंडी पा.) यांचे सुश्राव्य कीर्तन होणार असून त्यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.हा भक्तिमय सोहळा समस्त ग्रामस्थ, अंभोरा यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात येत असून या कार्यक्रमामुळे गावात आध्यात्मिक ऊर्जा संचारणार असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# पालकांच्या तक्रारींना यश; रेयान इंटरनॅशनल स्कूलची वेळ बदलली

## परिवर्तन सामाजिक संस्थेची गटशिक्षणाधिकाऱ्यांकडून दखल

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी:-**बोर्ड परीक्षेच्या नावाखाली इतर वर्गातील विद्यार्थ्यांवर अन्यायकारक निर्णय लादले जात असतील, तर त्याला विरोध करणे हे सामाजिक जबाबदारीचे कर्तव्य आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. खांदा कॉलनी, सेक्टर–११ येथील रेयान इंटरनॅशनल स्कूल येथे पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांची शाळा थेट पहाटे सकाळी सहा वाजता भरवण्याचा घेतलेला निर्णय अखेर मागे घेण्यात आला असून, परिवर्तन सामाजिक संस्थेच्या ठाम पाठपुराव्याला यश मिळाले आहे.

रेयान इंटरनॅशनल स्कूलमध्ये बोर्ड परीक्षा सुरू असल्याने १७ फेब्रुवारी ते २८ मार्च २०२६ या कालावधीत सकाळी सहा ते साडेनऊ या वेळेत शाळा भरण्याचे सर्कुलर काढण्यात आले होते. ही सूचना पालकांना ऑनलाईन पद्धतीने तसेच शाळेच्या ॲपवर पाठवण्यात आली होती. मात्र इतक्या पहाटे लहान मुलांना शाळेत बोलावणे हा अमानवी व अव्यवहार्य निर्णय असल्याचा तीव्र संताप पालकांमध्ये उसळला होता.

इतक्या कमी झोपेत मुलं शाळेत शिकायला जात आहेत की शिक्षेसाठी असा संतप्त सवाल पालकांकडून उपस्थित केला जात होता. झोपेअभावी मुलांचे शारीरिक आरोग्य बिघडणे, मानसिक ताण वाढणे, चिडचिड, थकवा आणि अभ्यासात एकाग्रता न राहण्याची भीती पालकांनी व्यक्त केली होती. या निर्णयाविरोधात पालकांकडून मोठ्या प्रमाणावर तक्रारी येऊ लागल्या.

या पार्श्वभूमीवर परिवर्तन सामाजिक संस्थाचे अध्यक्ष महादेव वाघमारे यांनी पुढाकार घेत थेट पनवेल तालुका गटशिक्षण अधिकारी शाहू सतपाल यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली. बोर्ड परीक्षा केंद्र असल्याचा भार इतर विद्यार्थ्यांवर टाकणे अयोग्य असून, सकाळी सहा वाजता शाळा भरणे हे शैक्षणिकदृष्ट्या, मानसिकदृष्ट्या व व्यवहार्यदृष्ट्या चुकीचे असल्याचे तक्रारीत स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते.


या तक्रारीची तातडीने दखल घेत मंगळवारी सकाळी सात वाजताच गटशिक्षण अधिकारी शाहू सतपाल यांनी खांदा कॉलनीतील रेयान इंटरनॅशनल स्कूलला भेट दिली. त्यांनी शाळा व्यवस्थापन व मुख्याध्यापकांकडे याबाबत जाब विचारला. सुरुवातीला "शाळा सात वाजता भरते, विद्यार्थी साडेसहाला येतात," असे उत्तर देण्यात आले. मात्र, यावेळी महादेव वाघमारे यांनी पालकांची बाजू ठामपणे मांडत शाळेने काढलेले अधिकृत सर्कुलर मुख्याध्यापकांच्या निदर्शनास आणून दिले.संपूर्ण वस्तुस्थिती समोर आल्यानंतर शाळा व्यवस्थापनाने नरमाईची भूमिका घेत अखेर निर्णय बदलला. १८ फेब्रुवारी २०२६ पासून सकाळी सात ते नऊ वाजून दहा मिनिटे अशी शाळेची वेळ निश्चित करण्यात आली असून, याबाबतचा अधिकृत संदेश सर्व पालकांना पाठवण्यात आला आहे.या निर्णयामुळे पालकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला असून, परिवर्तन सामाजिक संस्थेच्या तत्परतेमुळे आणि गटशिक्षण अधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपामुळे विद्यार्थ्यांवरील अन्याय टळल्याची भावना पालक वर्गातून व्यक्त होत आहे. भविष्यात अशा प्रकारचे निर्णय घेताना विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा व पालकांच्या भावना लक्षात घ्याव्यात, अशी अपेक्षा यावेळी पालकांकडून व्यक्त करण्यात आली आहे.

## पनवेलमध्ये बेशिस्त रिक्षाचालकांवर पोलिसांचा कडक प्रहार; १८० जणांवर कारवाई, ३४ रिक्षा जप्त – १.६८ लाखांचा दंड वसूल!

**दैनिक युवक आधार**

**पनवेल : प्रतिनिधी** : दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी पनवेल शहरात एका रिक्षाचालकाने जबरी चोरी करण्याच्या उद्देशाने महिला प्रवाशावर तीक्ष्ण धारदार हत्याराने जीवघेणा हल्ला केल्याची गंभीर घटना घडली होती. या धक्कादायक घटनेनंतर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

सदर घटनेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत पनवेल वाहतूक शाखा, पनवेल शहर पोलीस स्टेशन, खांदेश्वर पोलीस स्टेशन, आरटीओ पनवेल , मार्फत विशेष तपासणी व अंमलबजावणी मोहीम राबविण्यात आली. तसेच पोलीस मित्र ज्येष्ठ नागरिक यांचे सहकार्य लाभले "नियमभंग सहन केला जाणार नाही" असा स्पष्ट संदेश



देत ही धडक कारवाई करण्यात आली.

पनवेल रेल्वे स्टेशन (पूर्व व पश्चिम) रिक्षा स्टॅन्ड तसेच एचडीएफसी सर्कल परिसरात एकूण पाच पथकांमार्फत मोठ्या प्रमाणावर तपासणी करण्यात आली. या मोहिमेत अवैध प्रवासी वाहतूक करणारे, फिटनेस व विमा कालबाह्य असलेले, विना परवाना (लायसन्स), विना गणवेश तसेच नियमांचे उल्लंघन करणारे रिक्षाचालक/मालक यांच्यावर कठोर कारवाई करण्यात आली.

कारवाईचा तपशील पुढीलप्रमाणे :

एकूण रिक्षा तपासणी : ३५०

एकूण कारवाई : १८०

जप्त रिक्षा : ३४

दंड वसुली : रु. १,६८,५००/-

...सदर कारवाई श्री. औदुंबर भा. पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल वाहतूक शाखा यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली पार पडली.

या कठोर कारवाईमुळे बेशिस्त रिक्षाचालकांना स्पष्ट इशारा देण्यात आला असून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक दृढ झाली आहे. भविष्यातही अशा प्रकारच्या विशेष मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## राष्ट्रीय छावा संघटना रायगडच्या माणगाव तालुका अध्यक्षपदी पद्माकर उभारे यांची नियुक्ती!

**प्रतिनिधी सचिन पवार/माणगांव**

**रायगड :** राष्ट्रीय छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री गंगाधर काळकुटे पाटील यांच्या आदेशानुसार प्रदेशाध्यक्ष श्री निखिल दादा गोळे व कोकण अध्यक्ष श्री भारत सरपरे यांच्या अध्यक्षतेखाली काल दिनांक 16/02/2026 सोमवार रोजी माणगाव तालुक्यातील प्रतिष्ठित व्यक्तींची सदिच्छा भेट घेऊन रायगड जिल्हा कोकण उपाध्यक्ष तथा रायगड जिल्हा अध्यक्ष श्री राजू मोहन रोडेकर यांनी प्रतिष्ठित समाजातील व्यक्तींना राष्ट्रीय छावा संघटनेचे ध्येय व धोरण समजावून दिले. तसेच शिवशंभूचे व अनेक महापुरुषांचे विचार प्रतिष्ठित व्यक्तींना पटवून दिले त्यावेळी राजू मोहन रोडेकर रायगड जिल्हा कोकण उपाध्यक्ष



तथा रायगड जिल्हाअध्यक्ष यांच्या हस्ते पत्रकार पद्माकर उभारे यांची माणगाव तालुका अध्यक्षपदी नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली.

पद्माकर उभारे माणगांव तालुक्यातील जेष्ठ पत्रकार असून रायगड प्रेस क्लबचे सहसचिव, माणगांव तालुका प्रेस क्लबचे संघटक म्हणून अनेक वर्ष यशस्वीरित्या काम पाहिले आहे. तसेच माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या माणगाव तालुका अध्यक्षपदी काम करत आहेत तसेच यावेळी रायगड जिल्हा अध्यक्ष राजू रोडेकर यांचे हस्ते ॲड. यशवंत महादेव साधू यांची जिल्हा सल्लागार पदी नियुक्ती करण्यात आली. तसेच यावेळी श्री विवेक काटोलकर यांची सुद्धा माणगाव शहर नियुक्ती करण्यात आले.

सदर प्रसंगी स्वतः जिल्हाध्यक्ष राजू रोडेकर तसेच रायगड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख सचिन पवार यांनी उपस्थित राहुन शुभेच्छा दिल्या यावेळी जिल्ह्याच्या सर्व वरिष्ठ पदाधिकारी यांनी दूरध्वनीवरून अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## मुरुडमध्ये रमजान महिन्यानिमित्त मस्जिद परिसरात प्रकाश व स्वच्छतेची मागणी

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण प्रतिनिधी – मोहम्मद पिंजारी** : मुरुड शहरातील विविध मस्जिद परिसरात रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर फोकस लाईटची व्यवस्था करून परिसराची स्वच्छता करण्यात यावी, अशी मागणी नयी रोशनी युवामंच, मुरुड यांच्या वतीने ग्रामपंचायत प्रशासनाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दिनांक १८ फेब्रुवारीपासून मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना प्रारंभ होत असून या काळात शहरातील विविध मस्जिदींमध्ये नमाज अदा करण्यासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. विशेषतः



पहाटे व रात्री उशिरापर्यंत धार्मिक कार्यक्रम सुरू असल्याने परिसरात पुरेशा प्रकाशव्यवस्थेची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच मस्जिद परिसर स्वच्छ व सुस्थितीत राहावा यासाठी ग्रामपंचायतीने तातडीने स्वच्छता मोहीम राबवून आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

आठवडी बाजारातील ईदगाह मस्जिद, शिवनेरी चौकातील जामा मस्जिद, विठ्ठल मंदिर शेजारील कदीमी मस्जिद, स्मशानभूमी परिसरातील कब्रस्तान मस्जिद, दत्तनगर येथील बिलाल मस्जिद, ठोंबरे नगर तसेच पारू नगर येथील शरफोद्दीन मस्जिद परिसरात फोकस लाईट बसविणे व स्वच्छता करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर महंमद पिंजारी, सोहेल शेख, सुरज शेख, शरीफ सय्यद, असिफ सय्यद, तय्यब बागवान, अरबाज पठाण, रमजान शेख, युसुफ शेख, महमंद शेख, तोफिक शेख व इस्लाम शेख, अरबाज पठाण ,रमजान शेख ,सोहेल सय्यद,आसिफ तांबोळी,शोयब तांबोळी,सोहेल सय्यदयुसुफ शेख,महमंद शेख,तोफिक शेख इस्लाम शेखयांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## सेलूतील विवेकानंद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची विज्ञानवारीसाठी निवड

**दैनिक युवक आधार**

**सेलू/प्रतिनिधी शिवाजी पवार** : परभणी येथील परभणी अस्ट्रोनॉमिकल सोसायटी यांच्या वतीने राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित विज्ञानवारी पात्रता पूर्व परीक्षा २०२६ अंतर्गत घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय परीक्षेत भा.शि. प्र.संस्था अंबाजोगाई संचलित, विवेकानंद विद्यालय येथील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. विद्यालयातील दोन विद्यार्थ्यांची तृतीय फेरीसाठी जिल्हास्तरीय प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड



झाली आहे.प्रणव विठ्ठल सुरवसे व गौरांग निलेश पाटील या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. त्यांच्या यशाबद्दल हरिभाऊ चौधरी, उपेंद्र बेल्लूरकर,करुणा कुलकर्णी, मु.अ. नामदेव एकशिंगे,अनिल कौसडीकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त ७५ अभंगांचे भव्य व्हिडिओ चित्रिकरण ; नादब्रह्म साधना मंडळाचा उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त नादब्रह्म साधना मंडळाच्यावतीने ७५ अभंगांच्या भव्य व्हिडिओ चित्रिकरण उपक्रमास उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ करण्यात आला आहे. या उपक्रमाचा शुभारंभ लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते, सद्गुरू वामनबाबा महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या तळोजे मजकूर, योगीनगर (धोंडळी) येथील दत्त मंदिरात करण्यात आला.यावेळी भजनसम्राट हरिभक्त परायण निवृत्तीबुवा चौधरी, नादब्रह्म साधना मंडळाचे अध्यक्ष वसंतबुवा पाटील, सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. उमेश चौधरी, नगरसेवक नितेश पाटील, माजी सरपंच संतोष पाटील, विनोद पाटील, अशोक पाटील, राम पाटील, विलास खानावकर, कैवारी पाटील यांच्यासह नादब्रह्मा साधना मंडळाचा शिष्य परिवार उपस्थित होता.

या विशेष उपक्रमांतर्गत एकूण पंच्याहत्तर अभंगांचे ध्वनीमुद्रण व व्हिडिओ चित्रिकरण



करण्यात येत आहे. रेकॉर्डिंग प्रसंगी भजनसम्राट निवृत्तीबुवा चौधरी यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांच्या अमृत महोत्सवानिमित्त हा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक ठेवा समाजाला अर्पण केला जात आहे. हे अभंग केवळ एका वर्षापुरते मर्यादित नसून, पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या अभंगांची रचना व सादरीकरण विविध अनवट आणि पारंपरिक रागांवर आधारित चालींमध्ये करण्यात आले आहे. त्यामुळे नवोदित विद्यार्थी, शिष्यवर्ग आणि संगीत अभ्यासकांना रागांची शास्त्रशुद्ध व सुसूत्र ओळख होण्यास मोठी मदत होणार आहे. भारतीय शास्त्रीय संगीताच्या परंपरेतील रागसंवर्धन आणि सातत्यपूर्ण जतन हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.सदर उपक्रमामुळे भक्ती, संगीत आणि संस्कार यांचा सुंदर संगम समाजास अनुभवता येणार आहे. अभंगांच्या माध्यमातून आध्यात्मिक मूल्यांची जपणूक होऊन नव्या पिढीसमोर एक आदर्श उभा राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

लवकरच हे सर्व अभंग सर्व रसिक श्रोत्यांसाठी खुले करण्यात येणार असून, त्यांचे अधिकृत प्रकाशनही लवकरच करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे अमृत महोत्सव वर्षाला आणखी एक सांस्कृतिक व आध्यात्मिक अधोरेखा लाभली आहे.

## शाळा आंदोलनाने MSRDCची पाठ सोडली; दिवसा रस्तेकाम बंद, पण शासनाचे स्पष्टीकरण कधी?

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : अलिबाग तालुक्यातील पूर्व विभागात MS-RDC च्या रस्ते, गटारे आणि क्रॉसड्रेनच्या कामांमुळे वाहतूक कोंडीने थेट शालेय विद्यार्थ्यांना बसला. इयत्ता १०वी आणि १२वीच्या परीक्षा सुरू असताना विद्यार्थ्यांना वेळेवर शाळेत पोहोचणे अशक्य झाले. चिंतामणराव केळकर विद्यालयाचे अध्यक्ष अमर वार्डे यांनी २,००० विद्यार्थ्यांसह रस्त्यावर उतरण्याचा इशारा देत जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले. या निवेदनाची दखल घेत सामाजिक कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत यांनी अपर जिल्हाधिकारी संदेश शिर्के यांची भेट घेतली आणि MSRDC चे कार्यकारी अभियंता दिलीप हिंगे यांच्याशी चर्चा करून परीक्षा कालावधीत दिवसा रस्तेकाम पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेश मिळवले. आता कामे फक्त रात्री होणार असून, विद्यार्थी व पालकांना दिलासा मिळाला.शासनाच्या 'एकाच वेळी सर्वत्र रोडकाम' धोरणाने अलिबाग ते मुरुड-रेवदंडा-रोहा मार्गावरील नागरिक त्रस्तअलिबाग नागाव रेवदंडा मार्गे मुरुड, अलिबाग-रोहा या प्रमुख रस्त्यांवर एकाच वेळी रस्तेकाम चालू करून महाराष्ट्र शासनाने नागरिकांचे चांगलेच हाल केले आहेत. वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका व वेळेची नास





तर झालीच, पण शाळा-कॉलेज, बाजारपेठा व पर्यटनस्थळांना धक्का बसला. नागरिकांमध्ये "शासनाने स्पष्टीकरण द्यावे" असा रोष आहे. अलिबाग पूर्व विभागासह संपूर्ण तालुक्यातील हे काम एकत्रितपणे सुरू करण्यामुळे रस्ते खराब, धूळ उडाली व अपघात वाढले. स्थानिक पत्रकार व सामाजिक कार्यकर्त्यांनी सांगितले, "शासनाच्या या दुर्बिणीमुळे अलिबागसारख्या महत्त्वाच्या पर्यटन व निवासी केंद्रात नागरिक त्रस्त. एकाच वेळी काम का सुरू? नियोजन कुठे?

"नागरिकांचा रोष वाढतेय: आंदोलनाची हवा"

चिंतामणराव केळकर विद्यालयासह स्थानिक शाळा व संस्थांनी शासनाच्या या 'अराजक' धोरणावर टीका केली. अमर वार्डे म्हणाले, "विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळू नका. रस्तेकाम रोखा व अन्यथा २,००० विद्यार्थी रस्त्यावर येतील." संजय सावंत यांनी सांगितले, "अपर जिल्हाधिकारी संदेश शिर्के व अभियंता दिलीप हिंगे यांच्या तत्परतेमुळे तात्पुरता दिलासा मिळाला, पण शासनाने संपूर्ण तालुक्यातील कामांचे नियोजन करावे." नागरिक चर्चेत म्हणतात, "महाराष्ट्र शासनाने स्पष्टीकरण देऊन जबाबदारी स्वीकारावी, अन्यथा मोठे आंदोलन होईल.

"पार्श्वभूमी: शासनाच्या चुकीच्या नियोजनाचा फटका"

अलिबाग-नागाव-रेवदंडा-मुरुड मार्ग: एकाच वेळी गटारे, क्रॉसड्रेन व रस्ते रचना; वाहतूक पूर्णपणे ठप्प.अलिबाग-रोहा मार्ग: समांतर कामांमुळे प्रवाशांना तासन्तास कोंडी.परिणाम: परीक्षा विद्यार्थी, पालक, पर्यटक व स्थानिक व्यापारी त्रस्त; अपघात वाढले.मागणी: शासनाने वेळापत्रक जाहीर करावे व काम रात्री करावेत. या प्रकरणाने महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपटले आहे. अलिबाग तालुक्यातील नागरिक आता मोठ्या आंदोलनाची तयारी करत आहेत.

# ५ कोटींचे बजेट, कमावले तब्बल ८३ कोटी! आता नेटफ्लिक्सवर धुमाकूळ घालतोय २ तास २८ मिनिटांचा चित्रपट

काही तरी विनोदी पाहायचा विचार करत असाल तर ओटीटीवर ट्रेंडिंग एक चित्रपट तुम्ही पाहू शकता. अत्यंत कमी बजेटमध्ये तयार करण्यात आलेल्या या चित्रपटाने आधी बॉक्स ऑफिस गाजवलं आणि आता तो ओटीटी प्लॅटफॉर्मवरही ट्रेंडिंग आहे. हा कॉमेडी ड्रामा चित्रपट आहे. सध्या तो ओटीटीवर पहिल्या क्रमांकावर ट्रेंड करतोय. हा चित्रपट कोणता, त्याची कथा काय आहे आणि त्याचे बजेट व बॉक्स ऑफिस कलेक्शन, तसेच तो कुठे पाहता येईल? ते जाणून घेऊयात.

या चित्रपटातील कथा आधी श्रीमंत कुटुंबात जन्मलेल्या एका आळशी तरुणावर आधारित आहे. त्याचं नाव राजू असतं. राजू ही भूमिका नवीन पॉलिशेट्टीने साकारली आहे. राजू आधीप्रमाणेच आलिशान आयुष्य जगण्यासाठी चारुलता नावाच्या एका श्रीमंत तरुणीशी लग्न करण्याचा प्लॅन करतो. पण इथेच मोठा ट्विस्ट येतो. पैशांसाठी लग्न



करणाऱ्या राजूला समजतं की त्याला वारशात पैसे नाही तर कर्ज मिळालंय. त्यानंतर कथेत वळण येतं. मग तो चारूलताबरोबर राहतो की नाही? दोघे प्रेमात पडतात की वेगळे होतात की राजू आणखी काही करतो? ते जाणून घेण्यासाठी तुम्हाला हा चित्रपट पाहावा लागेल.

**चित्रपटाचे नाव काय?**

आम्ही ज्या चित्रपटाबद्दल बोलतोय, त्याचे नाव अनगनगा ओका राजू आहे. हा २०२६ मध्ये रिलीज झालेला एक तेलुगू कॉमेडी ड्रामा चित्रपट आहे. मारी याने हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. या चित्रपटाची निर्मिती सूर्यदेवरा नागा वामसी व साई सौजन्याने केली आहे.

या चित्रपटात नवीन पोलीशेट्टी व मीनाक्षी चौधरी यांनी मुख्य भूमिका साकारल्या आहेत. हा चित्रपट १४ जानेवारी २०२६ रोजी सिनेमागृहांमध्ये रिलीज झाला होता. त्यानंतर महिनाभराने म्हणजेच ११ जानेवारी रोजी तो ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर रिलीज झाला. हा चित्रपट नेटफ्लिक्सवर पहिल्या क्रमांकावर ट्रेंडिंग आहे.

**'अनगनगा ओका राजू'चे बजेट व बॉक्स ऑफिस कलेक्शन**

'अनगनगा ओका राजू' या चित्रपटाचे बजेट ऐकून तुम्हाला विश्वास बसणार नाही. होय. कारण या सिनेमाचे बजेट फक्त ८ कोटी रुपये आहे. या चित्रपटाने बजेटच्या १० पट कमाई केली होती. 'अनगनगा ओका राजू'ने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत तब्बल ८३ कोटी रुपयांचे कलेक्शन केले होते. आता हा चित्रपट नेटफ्लिक्सवरही ट्रेंडिंग आहे.

## 'चांगल्या गोष्टींना वेळ लागतो !', चाहत्यांच्या प्रश्नांवर अभिनेत्याची प्रतिक्रिया

बॉलिवूड अभिनेता रणबीर कपूर याचा शेवटचा थिएटरमध्ये प्रदर्शित झालेला सिनेमा एनिमल होता. २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटानंतर रणबीर मोठ्या पडद्यावर दिसलेला नाही. मात्र लवकरच तो दोन बहुप्रतीक्षित चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.


**'चित्रपटांना उशीर का लागतो?',चाहत्याचा थेट सवाल**

रणबीर नुकताच आपल्या ब्रँड ARKS च्या इंस्टाग्राम लाईव्ह सेशनमध्ये सहभागी झाला होता. यावेळी एका चाहत्याने मजेशीर कमेंट करत रणबीरच्या चित्रपटांना नेहमीच जास्त वेळ लागतो, यावर टोला लगावला. ही कमेंट वाचताच रणबीर हसत म्हणाला, "खरं सांगायचं तर ही माझीच बदनशीबी आहे. लोक ४-६ महिन्यांत चित्रपट पूर्ण करतात, पण माझ्या सिनेमांना नेहमीच जास्त वेळ लागतो. मात्र जेव्हा चित्रपट रिलीज होतो, तेव्हा तुम्ही वाट पाहिलेला सगळा काळ विसराल, अशी मला खात्री आहे. गेल्या २-३ वर्षांपासून मी खूप मेहनत घेतोय. चांगल्या गोष्टींना वेळ लागतो!"

**'लव्ह अँड वॉर'मध्ये स्टारकास्ट आणि सेटिंग**

'लव्ह अँड वॉर'मध्ये रणबीरसोबत आलिया भट आणि विक्की कौशल प्रमुख भूमिकेत आहेत. या पीरियड रोमँटिक ड्रामामध्ये रणबीर आणि विकी एअर फोर्स ऑफिसरच्या भूमिकेत दिसणार असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, भन्साळीसोबत रणबीरने याआधी सावरिया या चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले होते. सेटवरून लीक झालेल्या लुक्सवरून 'लव्ह अँड वॉर'ची कथा १९६० च्या दशकात घडत असल्याचा अंदाज बांधला जात आहे. मात्र कथेबाबत अजूनही गुप्तता राखण्यात आली आहे आणि चित्रपटाची रिलीज डेट आतापर्यंत दोनदा पुढे ढकलण्यात आली आहे.

एकीकडे चित्रपटांना लागणारा मोठा कालावधी आणि दुसरीकडे रणबीरची मेहनत – या दोन्हींच्या चर्चेमुळे त्याचे आगामी सिनेमे प्रेक्षकांसाठी अधिकच खास ठरणार आहेत. आता 'रामायण' आणि 'लव्ह अँड वॉर'मधून रणबीर पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर जादू दाखवणार का, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.



# मुख्य शूटरसह चार जणांना हरियाणातून अटक, आतापर्यंत ११ जणांना घेतले ताब्यात

दिग्दर्शक रोहित शेट्टी यांच्याशी संबंधित फायरिंग प्रकरणात पोलिसांनी मोठी कारवाई करत मुख्य शूटरसह चार जणांना हरियाणातून अटक केली आहे. या प्रकरणात आतापर्यंत ११ जणांना ताब्यात घेण्यात आले असून तपास यंत्रणा अधिक तपास करत आहे.

मुंबई क्राईम ब्रँचने दिग्दर्शक रोहित शेट्टीच्या घरावर झालेल्या (१ फेब्रुवारी २०२६) गोळीबार प्रकरणी मुख्य शूटरसह चार जणांना अटक केली आहे. यामध्ये मुख्य शूटर दीपक शर्मा सह चार जणांना आज १६ फेब्रुवारी रोजी हरियाणातील बहादुरगढ येथून अटक केली आहे. याप्रकरणी



पोलिसांना आतापर्यंत ११ जणांना अटक केलीय. चौकशीतून समोर आले आहे की, हा कट लॉरेंस बिश्नोई गँगचा आहे, जो परदेशातून ऑपरेट होत आहे. गँगमधील गुन्हेगार हरि बॉक्सर आणि आरजू बिश्नोईने दीपकला टास्क दिला होता.

दीपकने रोहित शेट्टीच्या घरावर गोळीबार केला होता. त्याचे साथीदार सन्नी आणि सोनूने रोहित शेट्टीच्या घराबाहेर रेकी केली होती. दुसरा साथीदार ऋतिकने दीपक आणि अन्य साथीदारांना लपवण्यास मदत केली होती. आतापर्यंत या प्रकरणी ११ जणांना अटक केली आहे. आधी सात जणांना पुणे आणि उत्तर प्रदेशमधून अटक केली होती. १५ जानेवारीला हरियाणा आणि राजस्थानच्या सीमेवरून अटक करण्यात आली.

सोशल मीडियाच्या माध्यमातून दीपक हा आरजू बिश्नोईच्या संपर्कात आला होता. आरजू हा परदेशात आहे. आरजूने शुभम लोनकर, जो बाबा सिद्दीकी केसमध्ये वाँटेड आहे, त्याच्याशी बातचीत केली. मग रोहित शेट्टीच्या घरावर फायरिंग प्लॅन बनवला.


दीपकला गोळीबाराचे ५० हजार रुपये मिळाले होते. परदेशी शस्त्र देखील दीपकला मिळाले होते. गोळीबार देखील परदेशी बंदुकीतून जाली. त्याला सांगण्यात आलं होतं की, पुढे देखील त्याला मोठी रक्कम मिळत जाईल. गोळाबारानंतर हे शूटर्स वेगवेगळ्या ठिकाणी लपून बसले होते. दिल्ली-एनसीआरमध्ये काही ठिकाणी तर काही हॉटेल्समध्ये देखील थांबले. ४-५ दिवसांनंतर बहादुरगढमध्ये एका शेतामध्ये ते लपले होते.


# शशी थरूर व प्रियांका चोप्राची ग्रेट भेट; खास फोटो शेअर करत म्हणाले, "आंतरराष्ट्रीय मंचावर भारतीयांना..."

अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात 'हार्वर्ड इंडिया कॉन्फरन्स २०२६'चे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेसाठी कॉंग्रेसचे खासदार शशी थरूर आणि प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेत्री प्रियांका चोप्रा या दोघांनाही मुख्य वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

शशी थरूर आणि अभिनेत्री प्रियांका चोप्रा यांची ही भेट जवळपास १० वर्षांनी झाली. त्यामुळे या भेटीचे काही खास फोटो शशी थरूर यांनी आपल्या सोशल मीडियावर शेअर करत आनंद व्यक्त केला आहे.

भेटीचे फोटो शेअर करत शशी थरूर यांनी लिहिले, "जवळपास एक दशकानंतर प्रियांका चोप्राची हार्वर्डमध्ये बॅकस्टेजला भेट झाली. ती हार्वर्ड इंडिया कॉन्फरन्समध्ये समारोपाचे





भाषण देणार होती, त्याआधी आम्ही एकमेकांना भेटलो. ती आज जे काम करत आहे, ते पाहून खूप आनंद झाला. ज्या आंतरराष्ट्रीय मंचावर भारतीयांना क्वचितच संधी मिळते, त्या मंचावर तिने यश मिळवून भारताचा अभिमान वाढवला आहे."

शशी थरूर यांच्या या पोस्टला उत्तर देताना प्रियांकाने लिहिले "तुम्हाला पुन्हा भेटून खूप आनंद झाला. तुमच्या प्रभावी वक्तृत्वाचे मी नेहमीच कौतुक केले आहे. लवकरच पुन्हा भेट होईल अशी आशा आहे."

या परिषदेत प्रियांकाने आपल्या करिअरमधील प्रवास आणि आलेल्या आव्हानांबद्दलही सांगितलं. शिक्षणासाठी अमेरिकेत गेल्याने तिच्या आयुष्यावर मोठा प्रभाव झाला, असे ती म्हणाली. तिच्या या भाषणाचे अनेक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

दरम्यान, प्रियांका चोप्राच्या आगामी कामाबद्दल सांगायचं झालं तर प्रियांका लवकरच ॲक्शन थ्रिलर 'द ब्लफ' या चित्रपटात दिसणार आहे. हा चित्रपट २५ फेब्रुवारीला प्रदर्शित होणार आहे.

तसेच, दिग्दर्शक एस. एस. राजामौली यांच्या बहुप्रतिक्षित 'वाराणसी' या चित्रपटातही ती मुख्य भूमिकेत झळकणार आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर महेश बाबू आणि पृथ्वीराज सुकुमारन देखील महत्त्वाच्या भूमिकेत आहेत.

## जगातील सर्वात महागडा तांदूळ; लक्झरी गिफ्ट म्हणून देतात लोकं

तांदूळ हा प्रत्येक भारतीय स्वयंपाकघरातील एक महत्त्वाचा घटक आहे. बहुतांश भारतीयांच्या जेवणात भाताचा समावेश असतोच. भातापासून विविध प्रकारचे पदार्थ बनवले. माहितीनुसार भारतात तांदळाच्या ६००० हून अधिक प्रकारांचे उत्पादन केले जाते. सामान्यतः भारतात तांदळाची किंमत ही ६० रुपये ते ३०० रुपये प्रति किलोपर्यंत असते. मात्र तुम्हाला माहिती आहे का? जगातील सर्वात महाग तांदूळ कोणता? त्याची किंमत ऐकूनच तुम्ही थक्क व्हाल !

जपानचे किन्मेमई प्रीमिअमची ( Kinmemai Premium ) जगातील सर्वात महाग तांदूळ म्हणून नोंद आहे. २०१६ मध्ये गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये सर्वात महाग तांदूळ म्हणून याची नोंद झाली होती. या तांदळाची केवळ किंमतच नाही तर उत्पादनाची पद्धत आणि चवही वेगळी आहे. या






तांदळाच्या ८४० ग्रॅम बॉक्सची किंमत सुमारे १०,८०० जपानी येन म्हणजे सुमारे भारतीय रुपयात ६-७ हजार रुपये होते. लॉन्चच्या वेळी हा तांदूळ सुमारे ९,४९६ येन म्हणजे सुमारे ९,८७२ हजार रुपये प्रति किलोला विकला गेला होता. आज वेगवेगळ्या बाजारपेठेत याची किंमत १२,५०० - १५,००० रुपये प्रति किलो आहे.

**इतका महाग का आहे तांदूळ?**

किन्मेमई प्रीमियम हा काही साधारण तांदूळ नाही. 'टोयो राइस कॉर्पोरेशन' नावाच्या जपानी कंपनीकडून याचे उत्पादन केले जाते. याचे वैशिष्ट्ये म्हणजे यात वेगवेगळ्या ५ तांदळाचे मिश्रण आहे. तांदळाच्या दरामागचे मुख्य कारण म्हणजे त्याची दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया. हा तांदूळ कापणीनंतर लगेचच बाजारात आणला जात नाही, तर साधारण ६ महिने त्याला ठेवले जाते. हा तांदूळ ६ महिने ठेवल्याने त्याची चव आणि पोत सुधारते असा कंपनीचा दावा आहे. त्यानंतर खास पद्धतीने तांदळाच्या वरचा थर हटवला जातो, ज्यामुळे त्यातील पोषक तत्व सुरक्षित राहतात.

**चव कशी आहे?**

रिपोर्टनुसार, जेव्हा हा तांदूळ शिजवला जातो तेव्हा त्याचे दाणे मौल्यवान हिऱ्यांसारखे चमकतात. तर सामान्य तांदळाच्या तुलनेत हा खूप गोड आणि नटी टेस्ट चवीचा असतो. ज्यांनी हा तांदूळ खाल्ला ते सांगतात की, याची टेस्ट बरीच क्रीमी आणि लोण्यासारखी आहे. तोंडात जातात तो विरघळतो. दरवर्षी या तांदळाच्या फक्त १००० पेट्यांचे उत्पादन केले जाते. एका बॉक्समध्ये छोटे छोटे १४० ग्रॅमचे ६ पॅकेट असतात असे कंपनीचे म्हणणे आहे. दरम्यान, जपानमध्ये हा तांदूळ लक्झरी गिफ्ट म्हणून दिला जातो.




**मेष** – कला-क्रीडा-साहित्यात मोठे यश मिळेल. नव्या ओळखीच्या सहवासाने उत्साह वाढेल. आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका.

**वृषभ** – भावनेच्या आहारी न जाता व्यावहारिक निर्णय घ्याल. आपल्या कार्यक्षेत्रात प्रगती कराल. चारचौघांत कौतुकास पात्र व्हाल.

**मिथुन** – ठरवलेले काम पूर्ण कराल. नवीन ओळख उपयुक्त ठरेल. क्षुल्लक गोष्टींनी नाराज होऊ नका. योग्य संधीसाठी वेळ द्यावा लागेल.

**कर्क** – तुमचे महत्त्व वाढेल. आपणास मान-सन्मान मिळेल. कला-क्रीडा स्पर्धेत यशस्वी व्हाल. आपल्यामुळे इतरांची गैरसोय टाळावी.

**सिंह** – तुमच्या कार्याला योग्य गती मिळेल. अतिअपेक्षा बाळगू नका. मानसिक समतोल साधावा. कोणतेही साहस करताना सतर्क राहावे.

**कन्या** – वैवाहिक जीवन आनंदी असेल. व्यवसायात प्रगती करता येईल. हट्टीपणाचा कळस करू नका. कधीही दुसऱ्याला कमी लेखू नका.

**तूळ** – जोडीदाराच्या सल्ल्याने कृती कराल. आपला बौद्धिक कस लागू शकतो. जवळच्या प्रवासाचा योग येईल. कामाचा व्याप वाढू शकतो.

**वृश्चिक** – जुनी रखडलेली कामे पूर्ण होतील. मेहनतीचे चीज होईल. वरिष्ठांचा पाठिंबा मिळेल. आळस करू नका. आहारावर नियंत्रण ठेवा.

**धनु** – गुंतवणुकीसाठी मार्ग सापडेल. आवडीनिवडीबाबत आग्रही राहाल. ओळखी होतील. वरिष्ठांच्या सल्ल्याशिवाय पुढे जाऊ नका.

**मकर** – हाती घेतलेले काम पूर्णत्वास जाईल. नम्रपणे तुमची भूमिका मांडाल. एखादी अडचण निर्माण होईल. बोलताना नेहमी भान राखावे.

**कुंभ** – उत्तम वैचारिक भूमिका घ्याल. आशावादी दृष्टिकोन कायम ठेवाल. नवीन शिकण्याची संधी सोडू नका. आपले मन अस्थिर होईल.

**मीन** – घरासाठी खरेदी कराल. जोडीदाराचा सल्ला विचारात घ्यावा. गैरसमजुती मनातून काढाव्यात. खर्चाचा ताळमेळ बसवावा लागेल.